LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

बीड वर्ष ३६ वे अंक २१ वा फोन २३०१०१ दिनांक १९ डिसेंबर २०२५ शुक्रवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 पाने ६ किंमत ४रु.

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही., ५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

## उधारीवर कपडे न दिल्याने तरुणावर कोयत्याने वार

### अंबाजोगाईतील पाटील चौकातील थरार

**अंबाजोगाई दि.१८ (प्रतिनिधी):- शहराच्या मध्यवर्ती असलेल्या पाटील चौक भागात उधारीवर कपडे देण्यास नकार दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून कपड्याच्या दुकानदारावर कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी दुपारी घडली आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

या बाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार संकेत विनोद नरके (वय २१, रा. खडकपुरा, अंबाजोगाई) असे जखमी फिर्यादीचे नाव आहे. संकेत याचे पाटील चौकात कपड्याचे दुकान आहे. १६ डिसेंबर रोजी दुपारी साडे बाराच्या सुमारास आरोपी त्याच्या दुकानात आले. त्यांनी काही कपडे पसंत केले, मात्र पैसे न देता उधारीवर मागितले.
पृथ्वीराज जोगदंड आणि अमन मोटेराव हे दोघेजण त्याच्या दुकानावर येऊन कपडे पसंत केले. ते कपडे उधारीवर दे असे म्हणाले तर संकेतने उधारीवर देण्यास स्पष्ट नकार दिला असता, आरोपींनी त्याला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आणि तेथून निघून गेले.काही वेळाने पृथ्वीराज आणि अमन हे त्यांचे साथीदार वीर शिंदे आणि दोनगहु (पूर्ण नाव माहित नाही, सर्व रा. परळी वेस, अंबाजोगाई) यांना घेऊन पुन्हा दुकानात आले. यावेळी पृथ्वीराजने सोबत आणलेल्या कोयत्याने संकेतच्या उजव्या भुवयीवर वार करून त्याला गंभीर जखमी केले. तसेच अमन मोटेराव याने दगड फेकून मारल्याने संकेतचा खालच्या बाजूचा एक दात तुटला. इतर साथीदारांनी त्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. आरडाओरडा ऐकून शेजारील दुकानदार कृष्णा मुद्गुलकर, रमेश टेहरे व विशाल पाटील यांनी धाव घेत भांडण सोडवले. जखमी संकेतने दिलेल्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात चारही

पान २ वर

# धनंजय मुंडेंना मंत्रीपद दिलं तर बीडमध्ये येऊन उपोषण करेन -खा.सुप्रिया सुळे



**बीड दि.१८ (प्रतिनिधी):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात आरोपी असलेल्यांच्या सोबत धनंजय मुंडे यांचे नाव जोडले जात आहे. कोकाटेंच्या रिक्त मंत्री पदावर जर धनंजय मुंडेयांची नियुक्ती केली, त्यांना मंत्री पद दिलं तर बीडमध्ये येऊन मी उपोषण करेन असा इशारा शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खा.सुप्रिया सुळे यांनी केले आहे.**

कोकाटे अडचणीत आलेले असताना माजी मंत्री धनंजय मुंडे काल दिल्लीत गेले होते. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची भेट घेतली. मुंडे मंत्रिपदासाठी लॉबिंग करत असल्याची चर्चा सुरु झाली. विशेष म्हणजे मुंडे हे फडणवीस सरकारमधून राजीनामा द्यावा लागलेले पहिले मंत्री आहेत. राज्यात गेल्या वर्षीच्या अखेरीस निवडणूक झाली. महायुती सत्तेत कायम राहिली.

पान २ वर



### राजेश विटेकरांना संधी?

**परभणीच्या पाथरी मतदार संघाचे आमदार राजेश विटेकर मंत्रिपदाच्या शर्यतीत आहेत. विटेकर यांना संधी दिल्यास मराठा आणि मराठवाडा ही दोन्ही समीकरणं साधली जातात. त्यामुळे एकाच दगडात दोन पक्षी मारले जातात. विशेष म्हणजे खुद्द विटेकर यांनीदेखील पक्ष नेतृत्त्वाकडे तशी मागणी केलेली आहे. मंत्रिपदासाठी आपला विचार व्हावा, अशी विनंती विटेकर यांनी आधीच केलेली आहे.**


## गेवराईतून भरदिवसा अपहरण केलेली महाविद्यालयीन तरूणी परभणी शहरात सापडली

### परभणी व गेवराई पोलिसांच्या कामगिरीचे अनेकांनी केले कौतुक

गेवराई दि.१८ (बापू गाडेकर) :- गेवराई शहरातील पंचायत समिती जवळ असलेल्या चौकातून एका महाविद्यालयीन तरूणीला बळजबरीने अल्टो गाडीत टाकून पळवून नेल्याची घटना गुरूवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांनी या घटनेची गांभिर्याने दखल घेऊन संबंधित गाडीचा व अपहरण करणाऱ्या तरूणासह महाविद्यालयीन तरूणीचा शोध घेण्यासाठी अटोकाट प्रयत्न केले. सदरील तरूणी कॉलेजमधून पंचायत समिती जवळून जाणाऱ्या रस्त्यावरून शास्त्री चौकाकडे जात होती. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेचा थरार सीसी टीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. अल्टो गाडीतून आलेल्या काही तरूणांनी पायी जाणाऱ्या तरूणीला दहशत निर्माण करून बळजबरीने उचलून नेले. त्यावेळी मुलीने जोरदार प्रतिकार केला. मात्र दोन तरूणांनी तिला मारहाण करून बळजबरीने गाडीत टाकले. काही लोकांनी गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. परंतु यावेळी संबंधित तरूणांनी धारदार शस्त्र हातात घेऊन दहशत निर्माण केली होती. हि अल्टो गाडी शास्त्री चौकातून पुढे राष्ट्रीय महामार्गाच्या दिशेने तलवाडा मार्गे माजलगावकडे गेल्याची माहिती गेवराई पोलिसांना मिळाली असता पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवली. हि गाडी तलवाडा मार्गे गेल्याचे तलवाडा येथील सीसी टिव्ही फुटेजमध्ये आढळून आले आहे. गेवराई शहरातून दिवसाढवळ्या अपहरण केलेली तरूणी परभणी शहरात पोलिसांना सापडली असून गेवराई पोलिस व परभणी पोलिसांनी केलेल्या यशस्वी कामगिरीचे अनेकांनी कौतुक केले आहे. हि थरारक घटना गेवराई शहरातील नवरंग जनरल स्टोअर्स जवळ घडली होती.

पान २ वर

# बीडमधील वार्ड क्रमांक ३ च्या सर्व बूथवर सीसी टीव्ही कॅमेरे बोगस मतदान करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई होणार



बीड दि.१८ (प्रतिनिधी):- येथील वार्ड क्रमांक ३ ब चे मतदान दि.२० डिसेंबर रोजी होत असून या प्रभागातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अमर नाईकवाडे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे. या वार्ड मधील सातही बूथवर सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहे. मतदान हे गुप्त असते व गुप्तच राहील, मात्र मतदान केंद्रात आक्षेपार्ह प्रकार करणारे या कॅमेऱ्यात कैद होणार आहेत. तसेच या सर्व मतदान केंद्रावर वाढीव पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. मतदारांना जबरदस्ती करणे, धमक्या देण्याचे प्रकार घडल्यास अशा व्यक्तिंवर तात्काळ कारवाई करण्यात येणार आहे. या वार्डात दुरंगी लढत होत असून एका प्रभागाचे मतदान २ डिसेंबर रोजीच झालेले आहे. उर्वरीत प्रभागाचे मतदान शनिवारी २० डिसेंबर रोजी होणार असून निवडणूक विभागाने या संदर्भात तयारी पूर्ण केली आहे. विप्रनगर भागातील मतदान राजस्थानी शाळेत होणार असून या ठिकाणी ५ मतदान केंद्र असणार आहेत. तर एमआयडीसी भागातील नागरिकांसाठी एमआयडीसी ऑफीसमध्ये मतदान होणार असून त्या ठिकाणी दोन मतदान केंद्र राहणार आहेत. प्रभागातील सुज्ञ आणि जागरुक मतदार कुठल्याही आमिषाला आणि धमक्यांना बळी पडणार नाहीत असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अमर नाईकवाडे यांनी व्यक्त केला आहे.

### मतदान गुप्त राहणार निर्भयपणे मतदान करा

**मतदान केंद्रात असलेले कॅमेरे हे फक्त केंद्रातील गैरप्रकार रोखण्यासाठी आहेत. प्रत्येक नागरिकाने केलेले मतदान हे गुप्त राहणार आहे, ते कोणालाही कळणार नाही. त्यामुळे नागरिकांनी कुठल्याही अफवांना व दबावाला बळी न पडता मतदान करावे असे आवाहन अमर नाईकवाडे यांनी केले आहे.**

### मतदार काम करणाऱ्या नानांच्या पाठिशी

गेल्या १५ वर्षापासून या वार्डात अमरनाना नाईकवाडे यांनी जे काम केलेले आहे त्याची पावती मतदानाच्या रुपाने त्यांना देण्याचा निर्धार वार्डातील मतदारांनी केलेला आहे. कुठल्याही धमक्या आणि आमिषाला बळी न पडता मतदार हे अमर नाईकवाडे यांना मतदान करणार असल्याच्या प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केल्या आहेत.

### पेन आणि शर्टच्या बटनला कॅमेरे असल्यास चेक करणार

**येथील वार्ड क्रमांक ३ मधील येथील २० डिसेंबरला होत असलेल्या मतदानास विरोधकांकडून काही मतदारांच्या खिशाला पेन आणि शर्टच्या बटनच्या माध्यमातून कॅमेरे लावून मतदानासाठी पाठविले जाण्याची शक्यता उमेदवार अमर नाईकवाडे यांनी व्यक्त केलेली आहे. त्या अनुषंगाने निवडणूक विभागाला त्यांनी लेखी तक्रार दिलेली आहे. त्यामुळे प्रत्येक बुथवर चेकींग केली जाणार असून असे आक्षेपार्ह प्रकार आढळल्यास कारवाई केली जाणार आहे.**

### भाजप उमेदवाराचा पराभव दिसू लागल्यामुळे आमदारांच्या मतदारांना धमक्या -अमर नाईकवाडे

**या प्रभागातील प्रभाग क्रमांक ब चे मतदान शनिवारी होत असून येथील मतदारांना मोबाईलद्वारे धमक्या दिल्या जात असल्याची तक्रार उमेदवार अमर नाईकवाडे यांनी निवडणूक विभागाकडे केली आहे. तसेच काही मतदारांना तुम्ही मतदानाला येऊ नका अशा पद्धतीचा दमही दिला जात आहे. सारडांचा पुतण्यांच्या सांगण्यावरुन आ.संदीप क्षीरसागर मतदारांना धमकावत असल्याचे अमर नाईकवाडे यांनी तक्रारीत म्हटले आहे. मतदारांनी कोणत्याही धमक्यांना व आमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन अमर नाईकवाडे यांनी केले आहे.**

## पंकज सुर्वे यांचे निधन

माजलगाव दि.१८ (प्रतिनिधी):- शहरातील नवनाथ नगर भागातील रहिवाशी असलेले पंकज नरहरी सुर्वे



(वय ४८ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दि. १८ गुरूवारी निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर मंगलनाथ स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, भाउ, बहिण, मुलगा असा परिवार आहे. सुर्वे परिवारावर कोसळलेल्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे

बीड दि.१८ :- शहरात ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## पारगावघुमरा ग्रा.पं.नरेगा भ्रष्टाचार संदर्भात पाटोदा पंचायत समीती समोर आमरण उपोषण

पाटोदा दि १८ (प्रतिनिधी):- पाटोदा तालुक्यातील पारगाव घुमरा ग्रामपंचायतीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (नरेगा) प्रत्यक्ष काम न करता बनावट बिले उचलल्याचा गंभीर गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत शिवराम गांगुर्डे व भरत काळे यांनी पाटोदा पंचायत समिती कार्यालयासमोर गुरुवारी गुरुवार दिनांक १८ पासून आमरण उपोषण सुरू केले आहे.




या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासंदर्भात यापूर्वी दिनांक ६ डिसेंबर २०२४ रोजी आंदोलकांनी आमरण उपोषण केले असता, गट विकास अधिकारी यांनी १५ दिवसांत चौकशी करून कारवाईचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, दिलेल्या मुदतीनंतरही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी पुन्हा आमरण उपोषणास सुरुवात करण्यात आले आहे.आंदोलकांचा आरोप आहे की, पारगाव घुमरा ग्रामपंचायतीने नरेगा अंतर्गत काही कामे कागदावर दाखवून शासकीय निधीचा गैरवापर केला आहे. प्रत्यक्षात कामे अस्तित्वात नसताना बिले उचलण्यात आली असून, दलित वस्तीतील अनेक कामे आजही अपूर्ण आहेत. याबाबत वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकारी, ग्रामसेवक व अभियंत्यांकडून जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. न्याय मिळत नसल्यामुळे आणि भ्रष्टाचाराविरोधात

पान २ वर

## सर्वसामान्य मतदार अमरनानांच्या पाठिशी

### भीमस्वराज्य सेनेचे विकास जोगदंड यांचा पाठिंबा

बीड दि.१८ (प्रतिनिधी):- प्रभाग क्रमांक ३ मधील निवडणूक ही धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी होत आहे. अमरनाना नाईकवाडे हे सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तिमत्व आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नावर झटणारे लोकप्रतिनिधी आहेत. त्यामुळे भीमस्वराज्य संघटनेच्या वतीने आम्ही त्यांना जाहीर पाठिंबा देत आहोत असे विकास जोगदंड यांनी सांगितले आहे. अमरनानांना पाडण्यासाठी सर्व क्षीरसागर एक झाले आहेत. मात्र नानांच्या पाठिशी सर्वसामान्य मतदार आहे, आम्ही आहोत असेही जोगदंड यांनी सांगितले.
बीड शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार अमर नाईकवाडे यांना विकास जोगदंड यांनी पाठिंबा दिला आहे. जोगदंड म्हणाले, प्रभाग क्रमांक ३ मध्ये अमरनाना नाईकवाडे यांच्यासारख्या चांगलं काम करणाऱ्या नगर सेवकाला प्रस्थापित जे राजकारणी आहेत ते अमरनाना नाईकवाडे यांचे राजकीय अस्तित्व संपविण्यासाठी एकत्र आले आहेत. मग आम्ही सर्वसामान्य त्यांच्यासाठी एकत्र यायचं नाही का? असा प्रश्न उपस्थित करत सर्वसामान्य मतदारांसह आम्ही सर्वजण अमरनानांच्या पाठिशी आहोत असे जोगदंड यांनी सांगितले आहे. आ.संदीप क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर हे अमरनानांना पाडण्यासाठी एक झाले आहेत. ज्यांनी उध्वस्त केले प्रस्थापित भ्रष्टाचाराचे ईमले आणि वाडे त्यांचं नाव आहे अमर नाईकवाडे. त्यांनी सर्वसामान्यांसाठी काम केलेले आहे. नाईकवाडेंची निवडणूक सर्वसामान्य मतदारांनी खांद्यावर घेतल्यामुळे जे प्रस्थापित उमेदवार आहेत त्यांच्या पायाखालची वाळू सरकलेली आहे, त्यामुळे जाणीवपुर्वक कुठलाही आधार नसतांना नाईकवाडे यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न

पान २ वर

प्लॉट विक्री करणे आहे
कॅनॉल रोड, स्व.विनायकराव मेटे मार्ग, सोळंकेंच्या बंगल्याच्या बाजुला, सिद्धीविनायक पार्क, लेन नं.1 मधील सर्व्हेनं.97 मधील, प्लॉट नं.53, पश्चिम मुखी 40 x 40 = 1600 स्क्वेअर फुट प्लॉट विक्री करणे आहे.
:: संपर्क ::
9130103103
7083100700
16418-13390

पाहिजेत
बीडमध्ये नगर रोडवर समर्थ लॉजींगवर (मॅनेजर) कामगार पाहिजे आहे.
गरजुंनी प्रत्यक्ष येऊन भेटावे.
:: संपर्क ::
समर्थ लॉजींग
नगर रोड, बीड.
Mob.9325067777
16430-13347

## प्रभाग क्रमांक ३ मधील नागरिकांनी जास्तीत जास्त मतदान करून प्रशासनास सहकार्य करावे

बीड दि.१८ (प्रतिनिधी):- मा.राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी जाहिर केलेल्या निवडणूकीच्या सुधारित कार्यक्रमानुसार बीड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ प्रभाग क्र.०३ साठी एकूण ७ मतदान केंद्रावर दि.२० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० मतदान घेण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने आवश्यक पोलिस बंदोबस्त व सर्व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पोलिंग पाटी दि. १९.१२.२०२५ रोजी दुपारी मतदान केंद्रावर पोहोचणार आहेत. तरी प्रभाग क्र. ०३ मधील सर्व नागरीकांना आवाहन

पान २ वर

## प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ.धीरज सर्वज्ञ यांना पितृशोक

बीड दि.१८ (प्रतिनिधी):- येथील शासकीय आयटीआय मधून सेवानिवृत्त झालेले श्रीकृष्ण सर्वज्ञ



याचे राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७८ वर्ष होते. श्रीकृष्ण सर्वज्ञ हे मनमिळावू स्वभावाचे व कडक शिस्तीचे म्हणून परिचित होते. गेल्या काही दिवसापासून ते आजारी होते. गुरुवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.

पान २ वर

## राष्ट्रसंत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त बीडमध्ये महाप्रसादाचे आयोजन-ॲड.सुधीर जाधव



बीड दि १८ (प्रतिनिधी)- समाजाला स्वच्छतेचा संदेश देणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त बीड शहरात महाप्रसादाचे आयोजन महाराष्ट्र राज्य परीट धोबी समाजसेवा मंडळ शाखा, बीड, बीड शहर परीट धोबी समाजसेवा मंडळ, बीड तसेच संत गाडगेबाबा तरुण परीट धोबी समाजसेवा मंडळ, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. हा महाप्रसाद कार्यक्रम शनिवार, दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत संपन्न होणार आहे.

पान २ वर

# संतश्रेष्ठ भगवानबाबा आणि वामनभाऊ यांनी समाजजागृतीचे कार्य केले - भगवान महाराज राजपुत

बीड दि. १८ (प्रतिनिधी) :- संतश्रेष्ठ भगवानबाबा आणि वैराग्यमूर्ती वामनभाऊ महाराज हे वारकरी संप्रदायात महान कार्य केले. समाज सुधारण्यासाठी बाबा आणि भाऊ यांचे सर्वश्रेष्ठ कार्य आहे. आध्यात्माबरोबरच समाजाला दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले. असे प्रतिपादन महंत ह.भ.प. भगवान महाराज राजपुत यांनी केले.

बीड येथील नगररोड भागातील माऊलीनगर येथे संत भगवानबाबा, वामनभाऊ, विठ्ठल- रुक्मिणी, हनुमान मूर्ती प्राण प्रतिष्ठापनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरीनाम सप्ताहात काल्याच्या कीर्तनात राजपुत महाराज बोलत होते.

'कोणी एकी भुलली नारी, विकिता गोरस घ्या म्हणे हरी, या जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर महंत ह.भ.प. भगवान महाराज यांनी विद्वत्तापूर्ण विवेचन करुन भाविकांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी बोलतांना राजपूत महाराज म्हणाले, माऊलीनगरमध्ये संत श्रेष्ठ भगवानबाबा, वामनभाऊ, श्री विठ्ठल- रुक्मिणी आणि हनुमान यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करून सुंदर आणि भव्य, दिव्य मंदिर उभारले आहे. एकात्मता आणि बंधुभाव निर्माण करणारे कार्य सप्ताहाच्या माध्यमातून होत आहे.

काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. भगवान महाराज राजपूत यांनी श्रीकृष्ण, गवळणी आणि सवंगडी यांच्या विविध क्रीडांचे विवेचन केले. राजपूत महाराज यांनी आपल्या कीर्तनात श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.



गायनाचार्य म्हणून ह.भ.प. प्रसाद महाराज जवरे, हनुमान महाराज मुंडे, अंगद महाराज सोनवणे, अविनाश महाराज केदार, श्रीराम महाराज सानप, आश्रुबा महाराज सानप, नामदेव म. मुंडे, वैजनाथ म. सानप, तर मृदंगाचार्य ज्ञानेश्वर तांदळे यांनी साथसंगत केली.

कार्यक्रमासाठी सप्ताह समितीतील केदारनाथ गुठे, वाघ सर, ढाकणे सर, जायभाये सर, भोंडवे आन्नासाहेब, बाळासाहेब केकान, नागरे तुकाराम, गर्जे सोपान फौजी, वारे बाबासाहेब फौजी, खाडे प्रभु, श्रीराम सानप, बाळासाहेब आदींची उपस्थिती होती.

# पिस्तुलने गोळ्या झाडून जिवे मारण्याचा प्रयत्न आरोपातुन प्रकाश मुंडे याची निर्दोष मुक्तता

## अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल

अंबाजोगाई दि. १८ (प्रतिनिधी) :- पिस्तूलने गोळ्या झाडून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या गंभीर आरोपातून प्रकाश मुंडे याची अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने दि.१७ डिसेंबर २०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली. अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्यायालयातील ड.उ.छे.२९ /२०२५ या प्रकरणात आरोपीविरुद्ध कलम १०९,११५,३५२, ३५१ भा.न्या.सं.तसेच कलम ३ व २५ भारतीय हत्यार कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ.रचना आर.तेहरा यांनी केली. सरकार पक्षातर्फे सादर करण्यात आलेला पुरावा, तसेच आरोपीच्या विधिज्ञांनी घेतलेला उलट तपास व सादर केलेले युक्तिवाद न्यायालयाने पाहिल्यानंतर सरकार पक्ष आरोपीविरुद्ध आरोप सिद्ध करू शकलो नाही. न्यायालयाने आरोपी प्रकाश मुंडे यांची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने विधिज्ञ डी.एम.काजगुंडे यांनी प्रभावीपणे काम पाहिले. त्यांना विधिज्ञ ए.डी. शेरेकर, बी.आय.चौधरी, अक्षय इंगळे व अनिल राठोड यांनी सहकार्य केले. अत्यंत गंभीर स्वरूपाचे व बहुचर्चित असलेले हे प्रकरण असल्याने निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. न्यायालयाच्या या निर्णया मुळे कायदेशीर वर्तुळात तसेच परिसरात विधीज्ञ डी.एम.काजगुंडे यांनी आरोपी प्रकाश मुंडे यांची बाजू योग्य रीतीने मांडली याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# रुग्णाचा मृत्यू डिस्चार्जनंतर घरी झाला, सर्व उपचार योग्य पद्धतीनेच केले-डॉ.अरुण बडे

## बळीराम मुंडेंचा हलगर्जीपणाचा आरोप शिवाजीराव हॉस्पिटलने फेटाळला

बीड दि.१८ (प्रतिनिधी):- धारूर तालुक्यातील भोगलवाडी येथील विठ्ठल मुंडे यांच्या मृत्यूला शिवाजीराव हॉस्पिटलचे संचालक डॉ.अरुण बडे जबाबदार असल्याचा आरोप मयताचे भाऊ बळीराम मुंडे यांनी केला होता. या संदर्भातील वृत्त विविध दैनिकांत प्रसिद्ध झाल्यानंतर आता डॉ.बडे यांनी सविस्तर खुलासा करत आरोप फेटाळले आहेत. रुग्णावर करण्यात आलेले सर्व उपचार अमेरिकन हार्ट असोसिएशन व एसीसी मार्गदर्शक तत्त्वांनुसारच झाले असून नातेवाईकांना निर्णयासाठी पुरेसा वेळ व पर्याय देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.

डॉ.बडे यांच्या म्हणण्यानुसार, २६ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता रुग्णाची अँजिओग्राफी करण्यात आली. तपासणीत हृदयाच्या तीन नसांमध्ये ब्लॉक आढळून आले. यामध्ये एक नस शंभर टक्के बंद असल्याने तातडीचा बायपास किंवा त्या नसावर आपत्कालीन अँजिओप्लास्टी असे दोन पर्याय नातेवाईकांसमोर मांडण्यात आले. हा सल्ला अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नातेवाईकांनी विचारविनिमयासाठी वेळ मागितल्याने रुग्णाला आयसीयूमध्ये हलवण्यात आले. सुमारे दोन तासांनंतर नातेवाईक व गावचे सरपंच हॉस्पिटलमध्ये आले. त्यांना अँजिओप्लास्टीचा धोका, संभाव्य परिणाम तसेच दुसऱ्या ठिकाणी उपचारासाठी रुग्ण शिफ्ट करण्याचा पर्यायही देण्यात आला. या चर्चेचे सुमारे वीस मिनिटांचे सीसीटीव्ही ऑडिओ-व्हिज्युअल रेकॉर्डिंग उपलब्ध असल्याचा दावाही करण्यात आला.

### मृत्यूचे कारण अनिश्चित ; डॉक्टरांचा युक्तिवाद

**डिस्चार्जनंतर तीन दिवसांनी, म्हणजेच ४ डिसेंबरच्या मध्यरात्री रुग्णाचा मृत्यू झाल्याची माहिती नातेवाईकांनी दिली. या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट नाही, असे सांगत डॉ.बडे यांनी वैद्यकीय कारणे मांडली. त्यांच्या मते, मुख्य नसाचा हार्ट अटॅक झालेल्या रुग्णांमध्ये अँजिओप्लास्टीनंतर तब्बल ४२ दिवसांपर्यंत अचानक मृत्यूचा धोका अधिक असतो. याला व्हेंट्रिक्युलर टॅकीकार्डिया असे म्हटले जाते. अशा वेळी हॉस्पिटलच्या बाहेर तातडीचा शॉक देणे जवळपास अशक्य असल्याने, डिस्चार्जनंतर झालेल्या मृत्यूसाठी डॉक्टरांना जबाबदार धरणे चुकीचे ठरते.**

सर्व बाजूंनी विचार करून नातेवाईकांनी अँजिओप्लास्टी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर शंभर टक्के बंद असलेल्या नसावर दोन स्टेंट टाकून यशस्वी अँजिओप्लास्टी करण्यात आली. त्यानंतर रुग्णाची धाप कमी झाली व हार्ट फेल्युअरची लक्षणे घटली. दोन दिवस आयसीयूमध्ये ठेवून तिसऱ्या दिवशी रुग्णाला जनरल वॉर्डमध्ये हलवण्यात आले. पुढील दोन दिवस रुग्णाने स्वतः दैनंदिन हालचाली केल्यानंतर डिसेंबर रोजी त्यांना पूर्णपणे बरे होऊन घरी सोडण्यात आले.

## झाडे लावा झाडे जगवा

# बाळराजेंना भेटण्यासाठी बंगल्यावर कार्यकर्त्यांची रीघ

## पवारांच्या नेतृत्वावरील विश्वासाचे नाते आणखी घट्ट



गेवराई दि.१८ (प्रतिनिधी):- गेवराई नगरपरिषद निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी घडलेल्या राड्यानंतर भाजप नेते बाळराजे पवार यांच्याविरोधात अटक वॉरंट निघाले. मात्र, कोणतीही पळवाट न काढता, कायद्यावर संपूर्ण विश्वास ठेवत बाळराजे पवार यांनी स्वतःहून गेवराई पोलीस ठाण्यात हजेरी लावली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर अटकेची कारवाई केली.

अटकेनंतर त्यांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी न्यायालयात सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने बाळराजे पवार यांना जामीन मंजूर केला. या निर्णयानंतर गेवराईतील कार्यकर्ते, समर्थक आणि नागरिकांमध्ये समाधान व दिलासा व्यक्त होताना दिसून आला.

दि.१६ रोजी बाळराजे पवार यांना अटक झाल्याची माहिती समजताच गेवराई शहरासह ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनी पोलीस ठाणे आणि न्यायालय परिसरात मोठ्या संख्येने गर्दी केली होती. आपल्या नेत्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली होती. न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष करत न्यायालयाचे आभार मानले आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास व्यक्त केला. काल जामीन मिळाल्यानंतर बाळराजे पवार यांच्या निवासस्थानी आज सकाळपासूनच कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. शहरातील कार्यकर्त्यांसह तालुक्यातील व ग्रामीण भागातील अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिक बाळराजे पवार यांची भेट घेण्यासाठी बंगल्यावर दाखल झाले. नेत्यावर विश्वास आहे. आम्ही तुमच्यासोबत आहोत. अशा भावना व्यक्त करत कार्यकर्त्यांनी त्यांना धीर दिला.

या संपूर्ण घटनाक्रमात बाळराजे पवार यांनी संयम, धैर्य आणि कायद्यावरील विश्वास दाखवला. त्यांच्या या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांमध्ये अधिकच आत्मविश्वास निर्माण झाला असून, बाळराजे पवार यांच्यावरील जनसमर्थन आणि कार्यकर्त्यांची निष्ठा पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली आहे.

संकटाच्या काळातही कार्यकर्त्यांचा मिळालेला पाठिंबा आणि जनतेचा विश्वास हेच आपले खरे बळ असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली असून, उद्या होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत सर्व सामान्य कार्यकर्त्याला न्याय देण्यासाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. गेवराईच्या राजकारणात बाळराजे पवार यांचे नेतृत्व अधिक मजबूत होत असल्याचे चित्र या निमित्ताने दिसून आले आहे.

बीडदि.१८ :- शहरात अनेक भागात विद्युत तारा धोकादायक स्थितीत झुकलेल्या आहेत. वीज वितरण कंपनीने लक्ष देऊन त्या तारा सुस्थितीत कराव्यात अशी मागणी होत आहे.

पान ६ वरून

## अल्पसंख्यांकांच्या मागणीला यश

या बद्दल सर्व अल्पसंख्याक समाजाच्या वतीने खुर्शीद आलम यांनी कर्तव्येदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह अप्पर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, पोलिस अधिकारी यांच्यासह सर्व कार्यालयचे वरीष्ठ व कनिष्ठ अधिकारी यांचे विशेष आभार मानले आहे.

## आ.प्रकाशदादा सोळंके यांना

विकासासाठी त्यांनी नेहमीच सक्रिय प्रयत्न केले असून पक्षसंघटन मजबूत करण्यातही मोलाची भूमिका बजावली आहे. माजलगाव मतदारसंघ हा ग्रामीण व अर्धग्रामीण स्वरूपाचा असून येथील प्रश्नांची जाण असलेले अनुभवी नेतृत्व राज्य मंत्रिमंडळात असणे अत्यंत आवश्यक आहे. मा. प्रकाश दादा सोळंके यांचा प्रदीर्घ अनुभव, प्रशासकीय समज व लोकसंपर्क पाहता त्यांना कॅबिनेट मंत्रीपद दिल्यास मराठवाड्याच्या विकासाला निश्चितच गती मिळेल, असा सर्वसामान्य कार्यकर्ते व जनतेचा विश्वास आहे. तरी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तसेच माजलगाव मतदारसंघ व मराठवाड्याच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मा. आमदार श्री. प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपद देण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वडवणी शहर अध्यक्ष गणेश म्हेत्रे यांनी केली आहे.

## धारूर परिसरात व तालुक्यात

परिस्थिती निर्माण झाली आहे या परिस्थितीमुळे तात्काळ वनविभागाने या बिबट्याचा शोध घेऊन याचा बंदोबस्त करावा अशी मागणी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली असून हे निवेदन अँड मोहन भोसले, पत्रकार अतुल शिनगारे, विनायक शिनगारे, नदीम मोमीन, जगदीश गोरे, शिवाजी यादव आदींनी दिले आहे.

## बीड शहर पोलिसांची चोरीस गेलेले व

तपासामध्ये प्राधान्याने काम करून कित्येक गुन्हे उघडतेस आणले त्यानंतर आता मोबाईल संदर्भातील आलेल्या तक्रारी बाबत प्राधान्याने तपास करून जवळपास १८ मोबाईल हस्तगत करण्यात यश मिळवल्याने पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ व त्यांच्या टीमचे कौतुक केले जात आहे.

## कु.युगंधा कोंडेजकर चा

शंकर देशमुख, नाना देशमुख, मुख्याध्यापक देशपांडे सर व त्यांचे सर्व सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आष्टी शिक्षण विभागांमधून युगंधा हिचा कौतुक सोहळा होत असल्याचे भगिनी निवेदिता कन्या प्रशालेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## मूल्यवर्धन प्रशिक्षणसाठी मुख्यकार्यकारी

गिरी मॅडम, गटशिक्षणाधिकारी समंदर खान, शिक्षण विस्तार अधिकारी सिद्धेश्वर माटे, राहुल चाटे, शेख शफी चाचू, नवले, योगेश पवार, मस्के मॅडम, जोशी मॅडम, इत्यादी सर्व विशेष शिक्षक, साधन व्यक्ती उपस्थित होते.

## न्यू हायस्कूल गेवराई येथे

या जनजागृती शिबिरात इयत्ता ८ वी ते १० वी वर्गातील सुमारे ९०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळा व पालकांनी घ्यावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमाची शोभा वाढवली. शिबिर यशस्वी करण्यासाठी न्यू हायस्कूल गेवराईचे मुख्याध्यापक डॉ. बी. आर. चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. एस. एच. थोटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. अमर नाटकर यांनी केले. यावेळी न्यायालयीन कर्मचारी श्री. ए. के. बचाटे, श्री. एल. एन. राऊत, तसेच गेवराई पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस उपनिरीक्षक उस्मान शेख उपस्थित होते. शाळेचे सर्व शिक्षकवृंद कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## बीड जिल्हा खादीम-उल-हुज्ञाज कमिटीच्या

ते बीड येण्या जाण्यासाठी नियोजन करतात. असे संस्थापक अध्यक्ष हाजी बी.एस. मोहसीन यांनी सांगितले आहे.

## घाटनांदुर व परिसरामध्ये युरिया

शेतकऱ्यांना रास्त भावाने आणि आवश्यक प्रमाणात युरिया खत देण्यात यावा. पिके जोमात आलेली आहेत. या पिकांना आवश्यक असलेला युरिया खत आवश्यक प्रमाणात पिकवाढीसाठी वापरतात त्याचाच फायदा घेऊन गावातील व परिसरातील कृषी सेवा केंद्राच्या मार्फत जादा पैसे घेऊन युरिया खताची विक्री केली जात आहे यूरिया २६० रुपयाच्या आसपास विक्री करायचे असे शासनाचे निर्देश आहेत. मात्र, यूरिया खतांची बॅग ३५० ते ४००/रुपयाला सरार्स विक्री केली जात आहे, अशा अनेक तक्रारी येत आहेत. कृषी विभाग त्यावरही कारवाई देखील करते मात्र कृषी केंद्र चालक शेतकऱ्यांना लुटण्याचा प्रकार काही थांबताना दिसत नाही. कृषी विभाग आणि प्रशासनानं याबाबत कठोर कावाई करणं आवश्यक आहे तसेच शेतकऱ्यांना खरेदी खताची पावती न देता त्यांचा अंगठा घेऊन प्रत्येक बॅग पाठीमागे शेतकऱ्यांची प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये आर्थिक पिळवणूक काही कृषी सेवा केंद्राच्या मार्फत केली जात आहे कृषी विभागाने तात्काळ याची दखल घेऊन जादा दराने युरिया खताची विक्री करणाऱ्या कृषी केंद्रावर कारवाई करून न्याय देण्याची मागणी शेतकरी करत आहेत.

## दिव्यांग व अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनतून अडीच

सुरक्षा आणि सक्षमीकरण प्रदान करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने दिव्यांग अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेत महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या असून, अनुदानाच्या रकमेत वाढ करून योजना अधिक प्रभावी करण्यात आली आहे. तसेच दिव्यांगव अव्यंग असा नवीन घटक समाविष्ट करण्यात आला असून त्यांच्या पुढील विवाहित जीवनात प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने घेतलेला हा निर्णय सामाजिक समता, सर्वसमावेशकता आणि भेदभावमुक्त समाज निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे .

या नव्या सुधारित योजनेनुसार दिव्यांग व अव्यंग विवाहासाठी रुपये १,५०,००० तर दिव्यांग अव्यांग विवाहासाठी रुपये २,५०,००० इतके अनुदान मिळणार आहे. ही रक्कम पती-पत्नीच्या संयुक्त बँक खात्यात थेट लाभहस्तांतरण (उद्दढ) प्रणालीद्वारे जमा केली जाणार असून, त्यापैकी ५० टक्के रक्कम दाम्पत्याने पाच वर्षांकरिता मुदतठेवीत ठेवणे अनिवार्य राहील. दिव्यांग व्यक्तींच्या विवाहातून मिळणारे भावनिक, मानसिक आणि

सामाजिक स्थैर्य लक्षात घेता अनुदानवाढ गरजेची होती. शासनाचा हा निर्णय भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता आणि प्रतिष्ठा या मूल्यांना अधोरेखित करणारा असून, समाज अधिक सर्वसमावेशक करण्यास मदत करणार असल्याने सर्व सामान्य दिव्यांनी समाधान व्यक्त केले आहे पत्रात शेवटी म्हटले की या योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे वधू अथवा वरा कडे दिव्यांग व्यक्ती अधिनियम प्रमाणे किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्वाचे आधार संलग्न वैध वैश्विक ओळखपत्र आवश्यक आहे. दिव्यांग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा तसेच वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी.

विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा. विवाह झाल्यानंतर एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे. दिव्यांग अव्यंग विवाह योजनेच्या अनुदानात वाढ करण्यास व दिव्यांग दिव्यांग विवाह हा घटक नव्याने समाविष्ट करण्याचा दिव्यांग कल्याण विभागाच्या प्रस्तावास व त्या अनुषंगाने सदर योजनेसाठी आवर्ती वार्षिक रूपये २४००,०० लाखाच्या खर्चास नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मान्यता देण्यात आली आहे.

तरी बीड जिल्ह्यातील सर्व सामान्य अविवाहित स्त्री, पुरुष अशा दिव्यांग व अव्यंग असलेल्यांनी तात्काळ आपल्या जीवन साथीचा शोध घेऊन विवाह प्रोत्साहन योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन समाजसेवक जे.डी. शाह यांनी केले आहे.

## श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला

२०२५ या पुरस्काराने माजलगाव शहरातील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेला सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विकास मंत्री महाराष्ट्र राज्य अतुल सावे, सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य डॉ. संजय कोलते, अध्यक्ष कॉसमॉस को-ऑपरेटिव बँक लिमिटेड ॲड.प्रल्हाद कोकरे, प्रजासक राज्य सहकारी बँक लिमिटेड मुंबई चे श्री विद्याधर अनासकर हे उपस्थित राहणार आहेत.. सहकार क्षेत्रामध्ये मराठवाड्यातील साखर कारखाने जिनिंग्स व विविध सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. श्रीमंगलनाथ मल्टीस्टेट चे संस्थापक अध्यक्ष श्री आर.जी कानडे व संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे यांनी या पुरस्काराबद्दल माध्यम अशी बोलताना सांगितले की, संस्थेच्या पारदर्शक व्यवहार वेळेवर कर्जवाटप व वसुली ठेवीदारांचा विश्वास संपादन, स्वयंरोजगार निर्मिती, महिला व युवक सक्षमीकरण व त्याचबरोबर सामाजिक उपक्रम या सर्व बाबींची दखल घेत श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ही संस्था या पुरस्काराची मानकरी ठरली आहे.

श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या सातत्यपूर्ण व लोकाभिमुख कामगिरीची ही पोच पावती आहे. निश्चितच हा पुरस्कार माजलगाव चे नाव लौकिक करत असून संस्थेच्या कार्याला अधिक प्रेरणा व ऊर्जा देणार आहे सदरील पुरस्कार संस्थेचे हितचिंतक, सभासद सर्व कर्मचारी वृंद यांच्या सहकार्याचे व परिश्रमाचे फलित असून सदरील पुरस्कार त्यांना समर्पित करण्यात येत आहे..

## डॉ.बाबा आढाव व पन्नालाल

सदर अभिवादन सभेसाठी डावे, पुरोगामी, लोकशाही वादी, कार्यकर्ते व राजकीयपक्ष व कामगारी कर्मचारी संघटना यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कॉ.नामदेव चव्हाण, राजकुमार घायाळ, शेरजमा खान पठाण, नवनाथ नाईकवाडे, रामभाऊ बादाडे, परमेश्वर रोडे, बबन कुकडे, आदीसह पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनी केले आहे.

## रत्नसुंदर अर्बन ॲप बँकेचा द्वितीय

तसेच याप्रसंगी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. संस्थेच्या कार्याचा आढावा, आगामी उपक्रम व सामाजिक बांधिलकी दर्शविणारी ही दिनदर्शिका निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

पान १ वरून

## धनंजय मुंडेंना मंत्री पद दिलं तर उपोषण

मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस यांची वर्णी लागली. पण त्यानंतर काही दिवसांत मुंडे अडचणीत आले. बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणात मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराडला अटक झाली. मुंडे यांच्यावरही गंभीर आरोप झाले. अखेर अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान त्यांनी राजीनामा दिला.

आता धनंजय मुंडे पुन्हा एकदा मंत्रिपदासाठी उत्सुक आहेत. काल ते अमित शहांच्या भेटीसाठी दिल्लीला गेले. याबद्दल दिल्लीतच असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना विचारणा करण्यात आली. 'मुंडे इथे आहेत हे मला माहीत नाही. त्यांचे हायकमांड तर मुंबईत आहेत. मग ते इथे काय करतात ते आम्ही त्यांना विचारु', अशी प्रतिक्रिया तटकरेंनी दिली. सोबतच विरोधकांचा मुंडे यांना पुन्हा मंत्रिपद देण्यास ठाम विरोध आहे. त्यामुळे मुंडे यांची मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची शक्यता धूसर होते.

धनंजय मुंडे मराठवाड्यातून येतात. ते वंजारी समाजाचे आहेत. मुंडे यांच्या गच्छंतीमुळे सध्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील एकही मंत्री मराठवाड्यातील नाही. कोकाटे मराठा समाजाचे आहेत. ते नाशिकमधून येतात. उत्तर महाराष्ट्रातून कोकाटे यांच्यासह छगन भुजबळ आणि नरहरी झिरवळ मंत्रिमंडळात संधी देण्यात आली. पैकी कोकाटेंनी राजीनामा दिला आहे. मराठा असलेल्या कोकाटे यांच्या जागी अन्य मराठा नेत्याला संधी देऊ शकते.

## गेवराईतून अपहरण केलेली तरुणी सापडली

अपहरण झालेली मुलगी परभणी शहरात पोलिसांना सापडली असून अपहरण करणारे आरोपी मात्र सापडले नाहीत. अवघ्या काही तासात गेवराईचे बहाद्दर पोलीस व परभणी पोलिसांनी त्या तरूणीला शोधण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे. हि यशस्वी कामगिरी पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष जंजाळ, सतीश कोटकर, दीपक लंके, पोलीस उपनिरीक्षक निशिगंधा खुळे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश पारधी, पोलीस कॉन्स्टेबल आरेफ बागवान यांनी व परभणी पोलिसांनी केली आहे. गेवराई पोलिसांविषयी उगाचच टिकेची झोड उठविण्यात आली असून याच पोलिसांनी अटोकाट प्रयत्न करून अवघ्या काही तासात अपहरण करण्यात आलेल्या तरूणीला शोधण्याचे काम केले आहे. या तरूणीचे अपहरण का करण्यात आले ? याविषयी मात्र गेवराई शहरात उलटसुलट चर्चा ऐकावयास मिळत आहे. याप्रकरणी पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून आरोपीला लवकरच जेरबंद करण्यात पोलिसांना यश मिळेल अशी माहिती गेवराई पोलिस ठाण्याचे सपोनि संतोष जंजाळ यांनी दिली आहे.

## डॉ.धीरज सर्वज्ञ यांना पितृशोक

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातवंडे, सुना असा परिवार आहे. बीड येथील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.धीरज सर्वज्ञ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रचार प्रमुख ॲड.रोहित सर्वज्ञ यांचे ते वडील होते.

गुरुवार १८ डिसेंबर रोजी बीड येथील अमरधाम स्मशानभूमीमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी बीड येथील डॉक्टर मंडळी, वकील मंडळी, भारतीय शिक्षक प्रसारक संस्थेचे शिक्षक तसेच संस्था पदाधिकारी याबरोबरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उधारीवर कपडे न दिल्याने कोयत्याने वार

आरोपींवर भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११७(२), ११५(२), ३५२, ३५१(२) आणि इतर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमोल गायकवाड हे करत आहेत.

## अमरनानांना विकास जोगदंड यांचा पाठिंबा

उमेदवाराकडून केला जात आहे. प्रस्थापित राजकारणी याला जातीय स्वरुप देऊन अमर नाईकवाडेंना या चक्रव्युहात अडकविण्याचा प्रयत्न करत आहेत. ते आमच्या सारख्या चळवळीतल्या कार्यकर्त्यांना पहावलं नाही त्यामुळे आम्ही या ठिकाणी एकत्र येऊन अमर नाईकवाडे यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे.

## राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीचे बीडमध्ये आयोजन

या निमित्ताने सकाळी ११ वाजता बीड शहरातील राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता निष्काम कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे महाराज सांस्कृतिक सभागृह, मोंढा रोड, बीड येथे महाप्रसाद कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे. या महाप्रसाद कार्यक्रमाला सर्व समाजबांधवांनी तसेच राष्ट्रसंत गाडगेबाबा प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन गणेश जगताप बीड जिल्हाध्यक्ष ॲड.सुधीर जाधव, शहराध्यक्ष अंबादास नवले, पप्पू शिंदे, विलास जाधव, जयंत राऊत, जगन्नाथ शिंदे ,शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, मनोज वाघमारे, बीड जिल्हा सचिव प्रवीण साळुंके, उपाध्यक्ष जिजा शिंदे, कार्याध्यक्ष संजय साळुंके, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष संतोष पवार, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, शहर सचिव अतुल साळुंके, कार्याध्यक्ष संतोष भालेकर, शितल राऊत, अमोल काळे, संदीप जाधव, प्रा. विजय जाधव, मनोज नवले, गणेश धोंगडे, विकी नवले, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, गणेश राऊत, मनोज नवले, यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पारगाव घुमरा ग्रा.पं.नरेगा भ्रष्टाचार...

आवाज उठवण्यासाठी नाइलाजाने आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. पारगाव घुमरा ग्रामपंचायतीतील नरेगा कामांची सखोल चौकशी, बनावट बिलांची तपासणी, दोषी अधिकारी व ग्रामसेवकांवर शिस्तभंगात्मक कारवाई, गैरवापर झालेला निधी शासनाकडे परत मिळवणे तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या वापराची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही आंदोलक शिवराम गांगुर्डे व भरत काळे यांनी दिला आहे.

## प्रभाग ३ मधील नागरिकांनी मतदान करावे

करण्यात येते की दि. २०.१२.२०२५ रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करुन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन सहा. निवडणूक निर्णय अधिकारी बीड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ यांनी केले आहे.

दैनिक पार्श्वभूमी दि.19/12/2025

**CHANGE IN NAME**

**I declared by this publication about change in my name of**

Old Name :- USMAN SHAIKH SARWAR SHAIKH

New Name :- USMAN MOHAMMAD SARWAR ATTAR

ADD :- Zenda Chauk Majalgaon Beed Maharashtra - 431131

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.

AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी



### पोलीस पाटील होण्यासाठी तरुणांनी तयारीला लागावे

बीड दि १८ (प्रतिनिधी)- रखडलेल्या पोलीस पाटील भरतीला दोन वर्षांपूर्वी शासनाने मान्यता दिली मात्र अनंत अडचणीमध्ये ही भरती झाली नाही यातच सर्व विभागांच्या बिंदुनामावलीला मान्यता मिळाल्यानंतर या भरतीतील महत्त्वाचा अडसर दूर झाला आहे. प्रशासनाने पोलिस पाटील पदांच्या गावनिहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.
येत्या २० डिसेंबरपर्यंत या पदांसाठी गावनिहाय आरक्षण जाहीर होईल, तर अंतिम आरक्षण ता. ३० डिसेंबरला जाहीर केले जाईल अशी माहिती मिळते आहे.. बीड जिल्ह्यातील ५ उपविभागात ११७९ पदे रिक्त आहेत ते भरण्यात येणार आहेत. तेव्हा गावच्या तरुणांनी पोलीस पाटील भरतीच्या तयारीला लागावे असे आवाहन धनंजय गुंदेकर यांनी केले आहे.

### काशीदवाडी, नागझरी येथे लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे जयंती साजरी

केज दि १८ (प्रतिनिधी) -केज तालुक्यातील येवता जिल्हा परिषद सर्कल मधील मौजे काशीदवाडी व नागझरी येथे विविध सामाजिक उपक्रम राबवून लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली.या निमित्ताने काशीदवाडी व नागझरी येथील जिल्हा परिषद शाळा तसेच वस्ती शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला चालना मिळावी व लोकनेत्यांच्या सामाजिक विचारांची जपणूक व्हावी, या उद्देशाने हा कार्यक्रम राबवण्यात आला. यावेळी काशीदवाडी व नागझरी येथील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन, व्हाईस चेअरमन, प्रमुख कार्यकर्ते तसेच भाजपाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.

## पुढारी लोक सूस्तावले तसे अधिकारीही मस्त झाले आमचे बीड शहर म्हणायलाही लाज वाटू लागली



बीड दि १८(प्रतिनिधी)- बीडच्या पालकमंत्र्यापासून ते स्थानिक पुढाऱ्यापर्यंत बीडच्या विकासासाठी किती कोटी आले ? काय काय विकास केला ? याच तुंतून सतत वाजविला जातं. पण विकास म्हणजे नेमकं काय ? असतं हे बीड कराला अद्याप समजलं नाही. मागील काही वर्षाखाली शहरातून जात असलेल्या धुळे सोलापूर महामार्गाचे काम झालं. पण उपयोग काय ? महामार्ग झाला तेव्हापासून आजतागायत या महामार्गावरील पंख्याची सिमेंट रस्त्याशी लेवल देखील झालेली नाही. पंखे भरून काढण्यासाठी टाकलेले मोठे मोठे दगड वर डोके काढून पहात आहेत . नागरिकांना पंख्यावर दुचाकी उभा करायला देखील भीती वाटते. अशा स्वरूपाचे हे पंखे आहेत .याच महामार्गावर कॅमेरे लावले पण सुरुवातीच्या काही दिवसानंतर या कॅमेऱ्याचे बुभूळ इकडून तिकडं फिरलेले कधी दिसून येत नाही. याच रस्त्यावर एकदा नव्हे तर दोनदा ट्राफिक सिग्नल बसवले गेले. परंतु ते आता भूमिगत झाले आहेत. शहरात पायलिचे १५ पुढारी आहेत, म्हणायला नेते म्हणावेत, तर इच्छेनुसार आणलेले अधिकारी देखील आहेत पण याची कोणाला काळजी नाही. पुढारी सुस्तावल्याने अधिकारीही मस्त आहेत. या सर्व प्रकाराने आमचे बीड शहर म्हणायची देखील लाज वाटत असल्याची तिखट प्रतिक्रिया तरुण वर्गातून व्यक्त केली जात आहे. बीड शहरामध्ये मातब्बर नेतेमंडळी आहेत. त्यांनी मनावर घेतलं की सरकारकडून कोटी कोटी च बजेट मंजूर करून आणतात पण उपयोग काय ? शहर विकासासाठी आणलेला निधी खर्ची घातला तरी त्यातून झालेल्या विकास कामाचा जनतेला किती फायदा झाला ?. ही संशोधनाची बाब ठरू लागली आहे . अनेक दिवसाच्या महत प्रयत्नानंतर शहरातील बीड अहिल्यानगर रस्त्याचे काम झालं. अस जरी दिसलं दिसत असलं तरी शहरातून गेलेल्या धुळे सोलापूर महामार्गाच्या साईट पंख्याचं काय ? टणक रस्त्याच्या खाली तीन ते चार इंच पंखे असल्याने या पंखावर उभ्या केलेल्या गाड्या सुद्धा वरती काढता येत नाहीत. बाजूच्या नाल्याचा तर विचारच करायची गरज नाही. अतिक्रमण करताना नाल्याच बुजून टाकल्या. त्यावर देखरेख करणारी यंत्रणा देखील डोळे झाक करून बसली आहे. मागील काही वर्षाखाली म्हणजे शिवसेनेच्या काळात बीड नगरपालिकेत विराजमान असलेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पहिल्यांदा ट्राफिक सिग्नलच काम केलं. हे सिग्नल दोन-तीन वर्षे कसेबसे चालले, पुन्हा मत प्राय झाले. यानंतरही पुन्हा सिग्नलच काम झालं आणि आता तर हे सिग्नल भूमिगतच झाले. रस्त्यावर एवढी रहदारी, कोणी कुठूनही घूसत. विशेष करून महिलांना जीव मोठे धरून स्कुटी चालवावी लागते. याच महामार्गावर बार्शी रस्त्यावर व राष्ट्रवादी कार्यालयाच्या पुढे काही अंतरावर डिव्हायडर संपल्यानंतर जो पडलेला खड्डा आहे त्यांन एकाचा बळी घेतला.तर अनेक जण पडत असून जखमी होतात. परंतु इथला रस्ता तयार करायचं कोणाच्याही आठवणीत येत नाही. बीडला जसे पालकमंत्री म्हणून अजितदादा पवार लाभले तेव्हापासून इतक्या कोटीचं बजेट आलं असं स्थानिक पुढारी सांगतात. नव्हे तर बजेट मंजूर करून आणायला स्थानिक पुढारी कमी नाहीत. पण साधं राष्ट्रीय महामार्गावरील शहरातून जात असलेल्या रस्त्याच्या बाजूचे पंखे दुरुस्त केले जात नाहीत ही शोकांतिका आहे. बाहेरगावचे लोक आल्यानंतर एवढा मोठा रस्ता असताना रस्त्याच्या बाजूचे पंखे देखील धड नाहीत. काय बीडची अवस्था ? असं कोणाच्यातरी तोंडून ऐकल्यानंतर आमच्यासारख्या तरुणांना आमचे बीड शहर म्हणायची देखील लाज वाटू लागली असल्याचे स्पष्ट मत व्यक्त केले गेले.

## सर्व ज्येष्ठ एकसंघ झाले तर ज्येष्ठांचे प्रश्न सुटतील-अण्णासाहेब टेकाळे



अंबाजोगाई दि १८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात दीड कोटी ज्येष्ठ नागरिक आहेत व फेस कॉम च्या माध्यमातून ७ हजार संघ व २० लाख सदस्य आहेत. सर्व ज्येष्ठांना एकत्र आणण्याचे कार्य चालू आहेत. ज्येष्ठांचे अनेक प्रश्न आहेत फेस कॉम च्या माध्यमातून ते सोडवण्याचे प्रयत्न संघटनेच्या माध्यमातून शासन दरबारी चालू आहेत. मागील काळात महात्मा फुले जन आरोग्य सारख्या योजनेमुळे ज्येष्ठांचे आरोग्याचा प्रश्न सुटला आहे. तसेच ज्येष्ठांना प्रत्येक गावात विरंगुळा केंद्र निर्माण करणे व ज्येष्ठांच्या कल्याणकारी अनेक मागण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. सर्व ज्येष्ठ एकसंघ झाली तर ज्येष्ठांचे सर्व प्रश्न सुटतील असे मत महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांनी व्यक्त केले ज्येष्ठ नागरिक संघ अंबाजोगाई यांच्या वतीने महाराष्ट्रात प्रथमच ज्येष्ठांचे स्नेहसंमेलन झाले त्याचा समारोप प्रसंग इथे बोलत होते. या संमेलनात ज्येष्ठांच्या विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात सामूहिक भजन स्पर्धा ,गीत गायन स्पर्धा ,विविध गुणदर्शन स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा , निबंध स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, विविध क्रीडा स्पर्धा, स्मरणशक्ती सामान्य ज्ञान स्पर्धा शेलापागोटे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते यात तीनशेहुन जास्त ज्येष्ठांनी भाग घेतला. ज्येष्ठांच्या स्नेहसंमेलनाच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. अनंतराव जगतकर होते तर उद्घाटक म्हणून महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे (फेस कॉम) अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे होते तर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून फेसकॉम चे सचिव चंद्रकांत महामुनी, माजी अध्यक्ष अरुण रोडे, माजी मंत्री पंडितराव दौंड ,माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी ,युवा नेते अक्षय मुंदडा, माजी आमदार पृथ्वीराज साठे इंजीनियरिंग कॉलेजचे प्राचार्य खडक भावी सर दक्षिण मराठवाडा प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष दामोदर थोरात, प्रभाकर कापसे, अमृत टेकाळे हे होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष दिगंबर राव साळुंखे, श्रीहरी नागरगोजे ,पुंडलिक बापू पवार ,दामोदर थोरात,सिंधुताई जोशी,कमल बरुळे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरित करण्यात आले.या कार्यक्रमात महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे माजी अध्यक्ष अरुण रोडे , सचिव चंद्रकांत महामुनी,माजी मंत्री पंडितराव दौंड,अक्षय मुंदडा, राजकिशोर मोदी, पृथ्वीराज साठे ,दामोदर थोरात यांनी मार्गदर्शन केले. यात स्थानिक नेतृत्वांनी ज्येष्ठ नागरिक संघ अंबाजोगाई चे कौतुक करून ज्येष्ठांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे अभिवचन दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश जाजू , इदूमती पोटपल्लेवार यांनी तर प्रस्ताविक मंगला भुसा यांनी केले. आभार सुलभा खेडगीकर यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवाजी शिंदे, ज्ञानोबा कुकडे, दीपा स्वामी, पुष्पा बगाडे, समीर पटेल, आशा वाघमारे, ललिता पुजारी, नारायण केंद्रे, कोंडीबा राऊत , गणेश शिंदे, शिवकुमार निर्मळे ,मंगल लोखंडे, दिलीप स्वामी यांनी परिश्रम घेतले.

### काळवीट तलावात पोहण्यासाठी उतरलेले पं.स.तील सेवानिवृत्त कर्मचारी बेपत्ता



अंबाजोगाई दि १८ (प्रतिनिधी)-- येथिल रहिवाशी व पंचायत समितीतील सेवानिवृत्त कर्मचारी विश्वनाथ बुरांडे (वय - ६४) हे पोहण्यासाठी शहरालगत असलेल्या काळवीट तलावात पोहण्यासाठी उतरले असता अचानक बेपत्ता झाल्याची घटना गुरुवारी सकाळी समोर आली आहे. या घडलेल्या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.
नेहमीप्रमाणे सकाळी पोहण्यासाठी तलावावर आलेल्या बुरांडे यांनी आपले कपडे व गळ्यातील माळ काठावर ठेवून पाण्यात प्रवेश केला. मात्र, बराच वेळ लोटूनही ते पाण्याबाहेर न आल्याने उपस्थित नागरिकांना संशय आला. तात्काळ ही बाब त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली.घटनेची माहिती मिळताच, अंबाजोगाई नगर परिषदेचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले असून तलावात शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. याशिवाय परळी येथून विशेष रेस्क्यू टीमलाही पाचारण करण्यात आले आहे. पोलीस व स्थानिक प्रशासन संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून असून पुढील तपास व शोधकार्य सुरू आहे.

### जीवाचीवाडी येथे ग्रामसभा घेण्याची मागणी

केज दि १८ (प्रतिनिधी)-तालुक्यातील जीवाचीवाडी येथे विहीर योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत गटविकास अधिकारी यांच्या प्रतिनिधी समक्ष ग्रामसभा घेऊन व्हिडीओ चित्रीकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे.
या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते सुभाष सखाराम सारुक जीवाचीवाडी यांनी संबंधित प्रशासनाकडे लेखी अर्ज सादर केला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे, योग्य लाभार्थ्यांना विहिरींचा लाभदेण्याबाबत अनेक वेळा मागणी करूनही सरपंच व सरपंच पती कडून अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचा आरोप आहे. तसेच ग्रामसभेत उपस्थित राहण्यास अडथळे आणले जात असून, पोलीस बंदोबस्तात ग्रामसभेत जाण्याची परवानगी द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.गावातील नागरिकांना पंधराव्या वित्त आयोगा अंतर्गत झालेल्या कामांची माहिती मिळत नसल्याचे सांगून, ग्रामपंचायतीचा कारभार कागदोपत्रीच चालत असल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे. या प्रकरणी ग्रामविकास अधिकारी यांच्याप्रतिनिधी मार्फत ग्रामपंचायतीची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच योग्य लाभार्थ्यांना विहिरींचा लाभ द्यावा, अशी मागणी अर्जदार व ग्रामस्थांनी केली आहे. प्रशासनाकडून यावर काय कारवाई होते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### धारूर येथे संत शिरोमणी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी साजरी

किल्ले धारूर दि १८ ( प्रतिनिधी)-जगतगुरु संत तुकाराम महाराजांचे यांचे शिष्य, महाराजांची गाथा पुनर्लेखन , महाराजांच्या १४ टाळकरापैकी एक असणारे संत संताजी महाराज जगनाडे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली,दरवर्षी प्रमाणे याही वर्षी संत संताजी महाराज जगनाडे यांची पुण्यतिथी तेली समाज बांधव मोठ्या उत्साहाने एकरूप होऊन साजरी करत असतात त्याचप्रमाणे याही वर्षी संताजी महाराज जगनाडे यांची पुण्यतिथी तेली समाज बांधव यांनी किल्ले धारूर शहराच्या मध्यवर्ती असणारे लिंगायत मठ येथे सर्व समाज बांधव एकत्र झाले होते,संताजी महाराज बद्दल मनोगत व्यक्त करताना दत्तात्रय बोरगावकर यांनी संताजी महाराज जगनाडे यांच्या जीवनगाथाबद्दल विस्तृत माहिती समाजाला दिली,त्यांनी समाज प्रबोधन व तुकाराम महाराजांबद्दल ची त्यांची निष्ठा वर्णन करणारे गोष्ट सांगून समाजाला त्यांच्या कार्याची माहिती दिली,सर्व समाज बांधवांनी मिळून संताजी महाराज जगनाडे यांच्या प्रतिमेला हार घालून पुष्प अर्पण करून व आरती करून सर्व समाज बांधवांनी अभिवादन केले.
याप्रसंगी समाजाची ज्येष्ठ बन्सी सोनटक्के, ज्येष्ठ पत्रकार नागनाथ सोनटक्के, माजी नगरसेवक बाळासाहेब सोनटक्के, दत्तात्रय बोरगावकर, नर्मदा बँकेचे कैलास बोरगावकर, बबन सोनटक्के, शंकर बनसोडे, दत्ता सोनटक्के,अशोक सोनटक्के, ज्ञानेश्वर शिंदे, दशरथ सोनटक्के, सचिन भालेकर, सिद्धू साखरे, गणेश शिंदे, संस्कार व्यवहारे, महेश सोनटक्के यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

## आ.प्रकाशदादा यांना कॅबिनेट मंत्रीपद देवुन त्यांचा सन्मान करावा-माधव शेडगे



वडवणी दि १८( प्रतिनिधी)-माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ओळख असलेले आमदार प्रकाशदादा सोळंके यांची जनतेने सलग पाचव्यांदा आमदार म्हणून निवड केली आहे. ही निवड जनतेचा त्यांच्यावर असलेला विश्वास, त्यांच्या कार्यकौशल्याची पावती व त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक-राजकीय योगदानाची साक्ष देणारी आहे. पुढील विकासासाठी हा प्रकार दादा सोळुंके यांना कॅबिनेट मंत्रीपद देऊन त्यांचा सन्मान करावा अशी मागणी माधव शेंडगे यांनी प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी आपल्या कार्यकाळात शेतकरी प्रश्न, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, सिंचन, रोजगारनिर्मिती तसेच सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर सातत्याने ठोस भूमिका घेतली आहे. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी नेहमीच सक्रिय प्रयत्न केले असून पक्षसंघटन मजबूत करण्यातही मोलाची भूमिका बजावली आहे.माजलगाव मतदारसंघ हा ग्रामीण व अर्धग्रामीण स्वरूपाचा असून येथील प्रश्नांची जाण असलेले अनुभवी नेतृत्व राज्य मंत्रिमंडळात असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांना कॅबिनेट मंत्रीपद दिल्यास मराठवाड्याच्या विकासाला निश्चितच गती मिळेल, असा सर्वसामान्य कार्यकर्ते व जनतेचा विश्वास आहे.तरी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तसेच माजलगाव मतदारसंघ व मराठवाड्याच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मा. आमदार श्री. प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपद देण्यात यावे,अशी मागणी वडवणी तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष माधव शेंडगे यांनी केले आहे.

## शेतकरी हक्क मोर्चाच्या पार्श्वभूमीवर लिंबागणेश येथे शेतकरी पुत्रांची बैठक

लिंबागणेश दि १८ (प्रतिनिधी)-बीड येथे आयोजित केलेल्या शेतकरी हक्क मोर्च्याच्या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात गुरुवार १८ डिसेंबर रोजी शेतकरी पुत्रांची बैठक संपन्न झाली. कापूस, सोयाबीन, तूर आदी शेतमालाला वाढीव दर मिळावा, सीसीआय व जिनिंग केंद्रांवरील शेतकऱ्यांची अडवणूक थांबवावी, हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच कापूस व सोयाबीनची परदेशातून होणारी आयात तत्काळ बंद करावी, अशा प्रमुख मागण्या यावेळी मांडण्यात आल्या.यावेळी दि.. २५ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणाऱ्या भव्य ''शेतकरी हक्क मोर्चा''मध्ये शेतकरी, शेतकरी पुत्र, शेतकरी मित्र तसेच शेतकऱ्यांप्रति संवेदनशील सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीत शेतकरी हक्क मोर्चाचे नेते राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे, बाळासाहेब मोरे पाटील,कुलदीप करपे, सुहास जायभाये यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भूमिका मांडली. कार्यक्रमास राजेभाऊ गिरे, रविंद्र निर्मळ, शंकर वाणी , अशोक जाधव,दामोदर थोरात,बाळकृष्ण थोरात, चिंतामण ढास,औदुंबर नाईकवाडे,सुरज कदम, संजय पावले, पिनु वाणी,राजेंद्र वायभट, दत्ता झोडगे, शिवाजी घरत, तुळशीराम वनवे, मनोहर वाणी, विठ्ठल कदम, सय्यद सलीम,सुनिल भोसले, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी बोलताना डॉ. गणेश ढवळे म्हणाले की, केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे. व्यापाऱ्यांकडून हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी होत असताना सरकार बघ्याची भूमिका घेत आहे. राज्य सरकारने कापसाला १२ हजार, सोयाबीनला ७ हजार व तुरीला १२ हजार रुपये प्रति क्विंटल भाव जाहीर करावा. वाढती महागाई, बियाणे, खत, औषधे व मजुरीचे वाढलेले दर पाहता शेतमालाला योग्य भाव न मिळणे म्हणजे सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.

## वडवणीचे ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांचा सन्मान



वडवणी दि १८ (प्रतिनिधी)- मराठी पत्रकार परिषद व स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने वडवणी तालुक्यातील देवडी येथील माणिक बागेत पुरस्कार वितरण व पत्रकारांचा गुणगौरव सोहळा रविवार दि.१४ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न झाला. या सोहळ्यात मागील ४० वर्षांपासून वडवणी तालुक्यात प्रामाणिकपणे पत्रकारिता करणारे ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करुन सत्कार करण्यात आला.
वडवणी तालुक्यातील देवडी येथील माणिक बागेत पुरस्कार वितरण व पत्रकारांचा गुणगौरव सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. या कार्यक्रमाला पद्मभूषण हिवरे बाजारचे आदर्श सरपंच पोपटराव पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे आरोग्य कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागाचे अध्यक्ष राजाभाऊ अदाटे, आरोग्य विभागाचे प्रमुख दिपक कैतके, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, राज्याचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कोषाध्यक्ष मन्सुरभाई शेख, सुनिल लोणकर, डिजीटल मिडीया राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह सत्कारमूर्ती ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब, ज्येष्ठ पत्रकार सुभाष देशमुख, शेतीनिष्ठ शेतकरी गोरख झाटे, कल्याण कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. यावेळी पत्रकारांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याचवेळी बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकारांचाही सत्कार करण्यात आला. यामध्ये ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांचा वरील मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करुन त्यांच्या कार्याचा सन्मान व सत्कार करण्यात आला. या सन्मान सत्काराला उत्तर देतांना ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ म्हणाले की, मराठी पत्रकार परिषद व स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने माझा केलेला हा सन्मान निश्चितपणे माझ्यासाठी ऊर्जादायी व प्रेरणादायी आहे. मी त्यांचा मनापासून आभारी आहे.

### ग्रामपंचायतची बदनामी करणाऱ्या विरोधात प्रजासत्ताक दिनी उपोषण-सरपंच डॉ.पठाण

डोंगरकिन्ही दि १८ (प्रतिनिधी)- पाटोदा तालुक्यातील नाळवंडी ग्रामपंचायत व सरपंचा बाबत माहिती अधिकाराच्या नावाखाली वेगवेगळ्या व्यक्तीच्या नावे सातत्याने अर्ज देऊन माहिती मागवून जाणीव पूर्वक त्रास देणे हा प्रकार सुरू आहे. याबाबत वृत्तपत्रामध्ये खोट्या बातम्या देवून लोकांची दिशाभूल करत आहेत .वरीष्ठांनी यांची तात्काळ दखल घ्यावी चौकशी करावी चुकीच्या प्रवृत्तीस आळा घालावा नसता ग्रामपंचायत कार्यालय नाळवंडी कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा लागेल असा इशारा सरपंच डॉ.इक्बाल पठाण यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.
नाळवंडी येथील एक स्वयंघोषित समाजसेवक माहिती अधिकाराचा चुकीचा वापर करुन अधिका-यांना अडचणीत आणुन आपला स्वार्थ साध्य करत आहेत.त्यांनी ग्रामपंचायत नाळवंडी व सरपंच म्हणुन माझी चुकीच्या पध्दतीने बातमी प्रसिध्द करुन बदनामी केलेली आहे. ज्यामुळे ग्रामपंचायत सरपंचाला मनस्ताप सहन करावा लागत आहे.आमचे कुटुंब हे अल्पसंख्याक सामाजिक असुनही गावामध्ये बहुसंख्य मराठा समाज असतानाही लोकांनी माझी जनतेमधुन सरपंच म्हणुन निवड केलेली आहे. १ जानेवारी २०२३ रोजी सरपंच पदाचा कार्यभार स्विकारला पासुन नाळवंडी ग्रामपचांयत चा कार्यभार पुर्णतः पारदर्शक ठेवण्याचा आपण पुरेपुर प्रयत्न केलेला आहे. वित्त आयोगाची जी काम केलेली आहेत ती सर्व नियमाप्रमाणे झालेली आहेत. तसेच गांवात मागील ३ वर्षामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये विकास कामे झालेली आहेत. नाळवंडी गांवातील दोन व्यक्तीच्या रोजच्या तक्रारी अर्जामुळे व माहिती अधिकार अर्जामुळे या ठिकाणी कोणीही नवीन ग्रामपंचायत अधिकारी येण्यास तयार होत नाही. ज्यामुळे लोकांची जन्म/मृत्यु/विवाह नोंदी व प्रमाणपत्र देण्या संबधी अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे गावातील लोकांचे/शेतक-यांचे खुप मोठे नुकसान होत आहे.हे सर्व प्रकार न थांबल्यास आपण व सर्व ग्रामपंचायत सदस्य संबधीत विघ्न संतोषी लोकांविरुध्द योग्य त्या कायदेशीर कार्यवाहीसाठी २६ जानेवारी २०२६ च्या ध्वजारोहन समारंभ नंतर उपोषण व आंदोलनचा मार्ग अवलंबनार आहोत.असा इशारा सरपंच डॉ. इकबाल पठाण यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिला आहे.

## संतोष वर्मा यांना बडतर्फ करण्याची ब्राह्मण संघर्ष समितीने केली निवेदनातून मागणी



केज दि १८(प्रतिनिधी) एक उच्च पदस्थ अधिकारी जो संपूर्ण जिल्हा सांभाळताना त्या जिल्ह्यातील सर्व जाती, धर्म, पंथ यांना सांभाळून घेऊन काम करणारा असावा व तठस्थपणे न्याय देणारा असावा असे अभिप्रेत असताना जातीय द्वेष मनात ठेवून जो काम करतो तो या पदाच्या पात्रतेचा नाही त्याने एका कार्यक्रमामध्ये ब्राह्मण मुली त्याच्या पोराला दान करत नाही किंवा संबध ठेवत नाही तोपर्यंत आरक्षण चालू ठेवलं जावे असे म्हणताना त्याला घटनेचा पण विसर पडला व त्याच्या मनात असणारा ब्राह्मण द्वेष उफाळून आला असा व्यक्ती अशा पदावर लायक नाही म्हणून त्याला कायमचे बडतर्फ करून कायदेशीर कठोर कारवाई करावी ज्यामुळे पुन्हा कोणी दुसरा अधिकारी असं कृत्य करणार नाही अशी कठोर शिक्षा करण्याची मागणी राष्ट्रपती महोदयांना केज तहसीलदार यांचे मार्फत निवेदन देऊन केली आहे.
महसूलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांना निवेदन देताना श्रीनिवासकेजकर, अनंत कोकीळ, श्रीधर खोत, ऋषिकेश जोशी, शिवराज मुथळे, सचिन जोशी, धनंजय कुलकर्णी आदी समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

# संपादकीय

## शून्य फलश्रुती असणाऱ्या अधिवेशनाची औपचारीकता कशासाठी ?

विधिमंडळाचे अधिवेशन म्हणजे लोकशाहीचा कणा, जनतेच्या प्रश्नांवर सरकारला उत्तरदायी धरण्याचे सर्वोच्च व्यासपीठ. मात्र यंदाचे नागपूर हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर सामान्य नागरिकांच्या हाती मात्र काहीही लागले नाही, ही कटू वस्तुस्थिती आहे.

नागपूर करारानुसार होणारे हिवाळी अधिवेशन विदर्भाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय आस्तत्वाचे प्रतीक आहे. शेतकरी आत्महत्या, सिंचन, शेतमालाचा भाव, आदिवासी विकास, बेरोजगारी आणि औद्योगिक मागासलेपण यांसारख्या प्रश्नांना प्राधान्य मिळणे अपेक्षित असते. मात्र यंदाच्या अधिवेशनात विदर्भासह राज्यातील हे मूलभूत प्रश्न मागेच पडले. विदर्भासाठी हिवाळी अधिवेशन फक्त प्रतिकात्मक ठरले.

अधिवेशनात शेतकरी, महिला आणि तरुण या प्रमुख घटकांचे प्रश्न पूर्णपणे दुर्लक्षित राहिले. शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबलाय, उत्पादनखर्च वाढला आहे, हमीभाव मिळत नाही, पीकविमा योजना कुचकामी आहे. कर्जमाफीच्या आश्वासनाचा अधिवेशनात उल्लेखही झाला नाही. महिलांसाठी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन देऊन मते घेतली गेली होती, पण सत्ता मिळाल्यानंतर या महिलांचा विसर पडला. अनेक महिलांचे आधीचे १५०० रुपयेही केवायसीच्या नावाखाली थांबले, तर बोगस लाभार्थी योजनेचा फायदा घेत असल्याचेही उघड झाले. रोख मदत हे खरे सक्षमीकरण नाही; महिलांना सुरक्षा, रोजगार, आरोग्य आणि शिक्षणाची हमी देणे हे खरे सक्षमीकरण असते. बेरोजगारीचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. सरकारी भरत्या रखडलेल्या आहेत, स्पर्धा परीक्षा वेळेवर होत नाहीत, निकाल लवकर लागत नाहीत, सरकारची कँत्राटीकरणावर जोर आहे. रोजगारनिर्मिती, औद्योगिक धोरण, स्थानिक रोजगार आणि कौशल्य विकास यांसारख्या मुद्द्यांवर सरकारकडे काही ठोस नीती आहे असे दिसले नाही. शेतकरी, महिला आणि तरुणांच्या आशा अधिवेशनात धुळीस मिळाल्या; उरले फक्त आश्वासनांचा धूर आणि वास्तवाची राख. राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ प्रचंड मोठी वाढ झाली आहे. कायदे असूनही महिला सुरक्षित का नाहीत? हा मूलभूत प्रश्न अधिवेशनात दुर्लक्षित राहिला. निर्भया फंडाचा वापर, फास्ट ट्रॅक न्यायालयांची संख्या, पोलिस यंत्रणेची जबाबदारी या मुद्द्यांवर सरकारकडे फक्त आकडेवारीशिवाय काही ठोस नाही हे पुन्हा एकदा दिसून आले. डॉ. संपदा मुंडेंची आत्महत्या असो किंवा नाशिकच्या मालेगांवची अवघ्या तीन वर्षाची अत्याचारग्रस्त चिमुरडी यांच्याबद्दल सत्तेत बसलेल्या लोकांना संवेदना नाहीत हे अधिवेशनात स्पष्ट झाले.

कायद्याचे राज्य उरले आहे का? असा प्रश्न पडावा इतक्या मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढली आहे. गुन्हेगारीचे अधिक संघटित आणि हिंसक रूप आपण पहात आहेत. खून, खंडणी, टोळीयुद्ध राज्यभर सुरु आहे. एकट्या पुणे शहरात शंभरहून अधिक गुन्हेगारी टोळ्या कार्यरत आहेत. पोलिसांवरील राजकीय दबाव, पोलिसांची स्वायत्तता, मनुष्यबळाची कमतरता आणि तपासातील त्रुटी यावर अधिवेशनात सखोल चर्चा होणे अपेक्षित होते; पण ती झाली नाही. ड्रग्सचे कारखाने आणि बोगस कॉलसेंटरचा सुळसुळाट ही राज्यासाठी गंभीर बदनामीची बाब आहे. तरुण पिढी अमली पदार्थांच्या विळख्यात अडकत असताना आणि परदेशी नागरिकांची फसवणूक करणारी रॅकेट्स खुलेआम कार्यरत आहेत. यात सरकारी अधिका–यांचा सहभाग असताना कारवाई होत नाही, या बाबतही सरकार उदासीनच दिसले.

मुख्यमंत्री समृद्धी महामार्ग, शक्तीपीठ महामार्ग आणि गडचिरोलीच्या तथाकथित विकासाची आकडेवारी सांगत असले, तरी वास्तव वेगळे आहे. समृद्धी महामार्गातून २० हजार कोटींच्या उत्पन्नाचे दावे करण्यात आले, पण प्रत्यक्षात केवळ सुमारे २ हजार कोटींचेच उत्पन्न झाले असून अपघातांत बळींची संख्या वाढत आहे. गडचिरोलीचा विकास स्थानिकांसाठी नसून खाणमालक आणि स्टील कँपन्यांसाठी सुरू आहे; आदिवासी, शेतकरी आणि युवक मात्र दुर्लक्षित आहेत. शक्तीपीठ महामार्गामुळे अल्पभूधारक शेतकरी भूमिहीन होणार आहेत. तरीही या सिमेंटच्या रस्त्यामुळे महाराष्ट्र दुष्काळमुक्त होईल, असे दावे केले जात आहेत. महामार्ग पाणी देत नाही, तो नदी नाही, याचे भानही सरकारला राहिले नाही. आकडे फुगवणे, वास्तव लपवणे आणि जनतेला मूर्ख समजणे हा सत्ताधाऱ्यांचा नित्यक्रम झाला आहे.

## भरत नागरे यांनी घेतला शिरूर पं. स. गटविकास अधिकारीपदाचा पदभार

शिरूरकासार,दि १८( प्रतिनिधी)– शिरूर कासार पंचायत समितीचे नवनियुक्त गटविकास अधिकारी म्हणून भरत नागरे यांनी पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी ते धुळे येथे उपशिक्षणाधिकारी पदावर कार्यरत होते. त्यानंतर त्यांची गटविकास अधिकारी पदावर निवड झाली असून प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यानंतर शासनाने त्यांची पहिली नियुक्ती शिरूरकासार पंचायत समिती येथे केली आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर गटविकास अधिकारी भरत नागरे यांनी पंचायत समितीतील सर्व विभागप्रमुख व कर्मचारीवर्गाची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी नियमानुसार कामकाज करणे, शिस्तीचे पालन करणे, नियमित उपस्थित राहणे, पारदर्शक व लोकाभिमुख कारभार राबवणे, तसेच शासनाच्या योजना प्रभावीपणे अंमलात आणणे आवश्यक असल्याचे स्पष्ट निर्देश दिले. कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीत कुचराई अथवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसून, नियमांचे उल्लंघन झाल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.शिरूर कासार पंचायत समितीचा कारभार जिल्ह्यात आदर्श ठरेल, अशा पद्धतीने सर्वांनी काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त करताना भारत नागरे यांनी सांगीतले.

## रोहन गलांडे यांचे दुसऱ्या दिवशीही उपोषण सुरूच

केज दि १८ (प्रतिनिधी) - चिंचोली माळी दि १८(प्रतिनिधी) - विविध प्रलंबित नागरी व शासकीय मागण्यांच्या पूर्ततेसाठी रोहन गलांडे यांनी १७ डिसेंबर रोजी सायंकाळी केस तालुक्यातील चिंचोली मार्गे येथील संत नामदेव मंदिर सभागृहात बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. दुसऱ्या दिवशीही त्यांचे उपोषण चालूच असल्याचे सांगण्यात आले.

चिंचोली माळी येथील छत्रपती संभाजी महाराज चौक (नागबेट वस्ती) ते संत नामदेव महाराज मंदिरा पर्यंत रस्ता व नालीचे काम त्वरित सुरू करण्यात यावे, या व इतर मागण्यासाठी हे आमरण उपोषण सुरू करण्यात आल्याचे रोहन गलांडे यांनी सांगितले आहे.मागण्या मान्य होई पर्यंत उपोषण सुरूच राहील,असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान गुरुवार १८ डिसेंबर रोजी त्यांचे उपोषण चालूच होते.

## पद्मपाणी राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावेत – दिलीप तरकसे

बीड दि १८ (प्रतिनिधी)- प्रती वर्षाप्रमाणे २६ नोव्हेंबर या संविधान दिनाचे अनुषंगाने पत्रकारिता, शिक्षक, समाजसेवक, प्रशासकीय अधिकारी, उघोजक, आदर्श शाळा, जीवन गौरव व साहित्य या विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय पद्मपाणी पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. तरी प्रतिष्ठेचा समजल्या जाणाऱ्या या पुरस्कारासाठी १० जानेवारी २०२६ पर्यंत प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. परिपूर्ण प्रस्तावासह व तीन पासपोर्ट फोटोसह प्रस्ताव खालील पत्त्यावर पद्मपाणि प्रतिष्ठान कार्यालयात पाठवावेत अथवा प्रत्यक्ष द्यावेत. आपले प्रस्ताव अध्यक्ष पद्मपाणि प्रतिष्ठान, पंचशील नगर,पालवन रोड बीड मो. ९७६७२४७०६३, ८६६८२२५३७९ संपर्क करुन पाठवावे. असे आवाहन प्रतिष्ठानद्वारे करण्यात आले आहे.

# थंडीची चाहूल वाढताच तरुणांची जीममध्ये वाढू लागली गर्दी ;तालुक्यात व्यायाम शाळा, योग शाळा हाऊसफुल्ल

माजलगाव (प्रतिनिधी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून थंडीने चांगलाच कहर केला असून, थंडीच्या दिवसात व्यायाम केल्याने शरीरयष्टी अत्यंत चांगली राहते. त्यामुळे तरुणाईची पावले जीमकडे तसेच योगा क्लासेस कडे वळू लागली आहेत. व्यायामाचा श्रीगणेशा करण्यासाठी हा ऋतू उत्तम समजला जात असल्याने सध्या शहरासह परिसरातील व्यायाम शाळेमध्ये गर्दी होऊ लागली आहे. आरोग्यासाठी उत्तम ऋतु म्हणून हिवाळ्यात शरीरयष्टी कमाविण्यासाठी आणि फिटनेससाठी अनेकांची पावले

जिमकडे वळू लागली आहेत. अनेक जण वाढलेले वजन कमी करण्यासोबत फक्त फिट राहण्यासाठी व्यायाम सुरू करताना दिसत आहेत. पावसाळ्यामध्ये कमकुवत झालेली पाचनशक्ती हिवाळ्यात सुधारू लागल्याने या ऋतूमध्ये जास्त भूक लागते त्यामुळे या काळात केलेला व्यायाम शरीरासाठी अधिक फायदेशीर ठरतो नियमित व्यायाम योग्य आणि पौष्टिक आहार घेतल्यास पुढे वर्षभर शरीर संपदा राखता येते. त्यामुळे



तरुणाई व्यायामाकडे वळली आहे.हिवाळ्यात उत्साहापोटी जिम लावणाऱ्यांची संख्या अधिक असते मात्र ती कायम टिकविणे काठीन जाते थोड्या दिवस तरुण तरुणी न चुकता रोज जिम मध्ये आपली हजेरी लावतात परंतु काही महिन्यातच जिम सोडून देतात. बहुतेक मुलांचा तालीम पेक्षा जीमकडे जाण्याचा कल जास्त असतो तर त्या तुलनेत मुलींचा झुंबा, ऍरोबिक्स आणि योगासने करण्याकडे कल आहे.एक व्यायाम कंटाळवाणा होत असल्यामुळे ग्रुप ऍक्टिव्हीटीला प्राधान्य मिळते असे प्रशिक्षक सांगतात.

कमी कालावधी मध्ये बनलेली बॉडी ही घातक तर जीवघेणी देखील होऊ शकते याची काळजी तरुणाईने घ्यावी असे या क्षेत्रातील अनुभवी बॉडी बिल्डर सांगत आहेत..

**प्रोटीन पावडर शरीरासाठी घातक**

धोक्याची घंटा चिंतेचा विषय शरीराला आकार देण्यासाठी काही तरुण प्रोटीन पावडर असेल किंवा घातक केमिकल्सचे सेवन करतात. शहरातील व ग्रामीण परिसरातील तरुण कमी वेळेत भरगच्च बॉडी तसेच पिळदार शरीरयष्टीसाठी या गोष्टींच्या आहारी जातात योग्य माहितीचा अभाव आणि योग्य मार्गदर्शन नसल्यामुळे तरुण आपली शरीरयष्टी घडवतात का बिघडवतात असा प्रश्न प्रशिक्षकांसह वैद्यकीय तज्ञांना नेहमीच सतावतोय.

## सावरकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सेवाश्रमाला दिला मदतीचा हात

बीड दि १८ ( प्रतिनिधी) – येथील स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विस्तार सेवा उपक्रमांतर्गत एक कौतुकास्पद उपक्रम राबविला आहे. ब्रह्मनाथ (येळम) येथील अनाथ मुलांच्या सेवाश्रमाला विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने किराणा सामानाचे दान करून आपल्या संवेदनशीलतेचे दर्शन घडविले आहे.विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन जमा केलेले अन्नधान्य आणि जीवनावश्यक किराणा सामान वाजत–गाजत न देता, अत्यंत आत्मीयतेने आश्रमातील मुलांसाठी सुपूर्द केले.हा उपक्रम विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य उमेश जगताप आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक विठ्ठल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. समाजातील वंचित घटकांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावा, असा मानस यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.याप्रसंगी विद्यालयाचे विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा. उमेश जगताप, मुख्याध्यापक विठ्ठल काळे, शिक्षक हरिभाऊ साबळे आणि रमण कुलकर्णी व दानशूर विद्यार्थी हे उपस्थित होते.सेवाश्रमातील व्यवस्थापकांनी सावरकर



विद्यालयाच्या या उपक्रमाचे स्वागत केले असून, विद्यार्थ्यांच्या या मदतीमुळे अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## माजी जि.प.सदस्य तथा बाजार समितीचे माजी सभापती आश्रुबा रसाळ यांचे दुःखद निधन

बीड दि १८(प्रतिनिधी)– तालुक्यातील मांजरसुंबा येथील माजी जि प सदस्य तथा बाजार समितीचे माजी सभापती अश्रुबा रसाळ यांचे बुधवारी वयाच्या ९१ व्या वर्षी वर्धा काळात निधन झाले या निधनाने सर्वत्र व्यक्त केली जात आहे.



तालुक्यातीलमांजरसुंबा येथील आश्रुबा रसाळ यांनी सरपंच म्हणून राजकीय वाटचाल करत लिंबागणेश गटाचे जि.प.सदस्य म्हणून प्रतिनिधित्व केले होते.तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी दोन टर्म पद भुषविले होते.स्व.केशरकाकु क्षीरसागर यांच्या समर्थक व विश्वासु म्हणून त्यांची तालुक्यात ओळख होती.गावातील सेवा सहकारी सोसायटी व ग्रामपंचायत वर तब्बल ६३ वर्ष वर्चस्व राखण्यात त्यांची मोलाची भूमिका होती.अनेक वर्षांपासून सोलापूर –धुळे राष्ट्रीय मार्गालगत राधा– कृष्ण आश्रम उभारुन राधा– कृष्ण मुर्तीची प्रतिष्ठापना करत मंदिर उभारले होते व नित्य नियमाने सेवा करत होते.नुकताच रसाळ परिवारातील लोकांच्या वतीने त्यांचा एकोन्यावा वाढदिवस साजरा करण्यात आला होता.आश्रुबा रसाळ यांच्या पश्चात त्यांचा जेष्ठ मुलगा गोरख दादा रसाळ यांनी अनेक वर्ष मांजरसुंबा ग्रामपंचायत सरपंच राहिले.स्व.गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत व मुकादम संघटनेचे अनेक त्यांनी काम केलेले आहे,करत आहेत.त्यांचा दुसरा मुलगा अरुण काका रसाळ एक टर्म तर त्यांची पत्नी मनिषा रसाळ विद्यमान सरपंचपद भुषवित आहेत.काही दिवसांपासून ते पॅरलिसिस झाल्यामुळे वाढत्या वयामुळे संभाजीनगर येथिल महावीर दवाखान्यात उपचारासाठी होते तिथेच बुधवार रोजी ११ वा.त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात रसाळ स्मशानभूमीत ५:३० वा.राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक जनसागराच्या उपस्थितीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती

## वैजनाथ मंदिर तीर्थक्षेत्र विकासाच्या बोगस कामांमुळे तब्बल ३७३ कोटी रुपयांची कामे सरकारने थांबवलली– देशमुख

परळी वै.दि १८ (प्रतिनिधी) परळीकरांनी केलेल्या तक्रारीनंतर शासन आणि प्रशासनाने कार्यकारी अभियंता दर्जाचे चार अधिकाऱ्यांच्या कमिटीने दिलेल्या अहवालानंतर सरकारने वैजनाथ मंदिर तीर्थक्षेत्र विकासाचा निधी सुमारे ३७३ कोटींचा निधी थांबवला आहे. अशी माहिती माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

कालपासून आ. धनंजय मुंडे यांनी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन परळी वैजनाथ येथील वैद्यनाथ मंदिराचा केंद्राच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी असलेल्या प्रसाद योजनेत समावेश करावा अशा बातम्या प्रसार माध्यमांत पेरण्यात आल्या आहेत.पण, सत्य खूप वेगळे आणि धक्कादायक आहे. गेल्या काही दिवसांपासून धनंजय मुंडे हे कधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कधी उपमुख्यमंत्री अजित दादा यांची भेट घेतली अशा बातम्या येत आहेत. बोगस कामांवर स्टे आल्याने धनंजय मुंडे बिन पाण्याच्या माशासारखे तडफडत आहेत. खात्रीलायक माहितीनुसार धनंजय मुंडे यांच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी केराची टोपली दाखवली. शेवटचा मार्ग म्हणून त्यांनी दिल्ली दरबारी हजेरी लावत गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली.यानंतर परळीच्या विकासाला बोगस कामे करून विकास थांबविण्याचे पाप करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आम्ही परळीकर शासनाकडे मागणी करणार आहोत. यासाठी लवकरच आम्ही जनआंदोलन सुरू करणार आहोत. असेही माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगीतले आहे.

## हॅन्डलींग ऑफ इलेक्ट्रॉनिक गॅझेटस् कार्यशाळा संपन्न

बीड दि १८(प्रतिनीधी)– येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय, बीड भौतिकशास्त्र विभाग आयोजित एक दिवशीय हॅन्डलींग ऑफ इलेक्ट्रॉनिक गॅझेटस् कार्यशाळा गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयाच्या आयसीटी हॉल मध्ये संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये इहाण टेक्नोलॉजीचे जावेद शेख हे मुख्य डेमॉस्ट्रेटर म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभाग प्रमुख तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते. महाविद्यालयात होत असलेल्या विविध उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यशाळेत जावेद शेख यांनी मास्टरी द सेफ ॲन्ड स्मार्ट हॅन्डलिंग ऑफ इलेक्ट्रोनिक गॅझेट या विषयावर प्रात्यक्षीक व पिपिटी च्या सहाय्याने सखोल मार्गदर्शन केले. तर सबंधीत प्रात्यक्षीक व्हिडीओच्या माध्यमातून, विद्यार्थ्यांशी परस्पर संवाद साधुन फलदायी कार्यक्रम संपन्न केला. या कार्यशाळेत ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

## अटल इनोव्हेशन मिशनने द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय बीड यांना एटीएल स्कूल ऑफ द मंथ पुरस्कार प्रदान केला

बीड दि.१८ (प्रतिनिधी) – अटल इनोव्हेशन मिशन आणि नीती आयोग यांनी द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, बीड यांना ऑक्टोबर २०२५ महिन्याचा एटीएल स्कूल ऑफ द मंथ पुरस्कार प्रदान केला असून, हा अत्यंत गौरवान्वित क्षण विद्यालयासाठी आणि बीड जिल्ह्यासाठी खूप महत्त्वाचा आहे.

अटल इनोव्हेशन मिशनच्या कार्यक्रमांतर्गत व्यायामशाळेने असाधारण प्रदर्शन केले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अभजातता, सृजनशीलता आणि प्रयोगशील शिक्षणाला प्रोत्साहन देण्याची विद्यालयाची प्रतिबद्धता यासाठी हा पुरस्कार देण्यात आला आहे.

बीडस्थित या प्रतिष्ठित विद्यालयाने कार्यक्रमांतर्गत अनेक उद्यम हाती घेतले आहेत. विद्यालयातील शिक्षकांणी, प्रशासकांनी आणि विद्यार्थ्यांनी मिळून अभिनव कल्पनांना रूप देण्यासाठी एक सक्षम वातावरण निर्माण केले आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांना प्रयोगांच्या माध्यमातून वास्तवात रूपांतरित करण्याची संधी दिली जाते. या पुरस्कारात विद्यालयाचे संपूर्ण



समुदाय – विद्यार्थी, शिक्षक, प्रशासक आणि अभिभावक यांचा महत्त्वाचा योगदान आहे. प्राचार्य लाहोटी एस. के., उपप्राचार्य हावळे ए. ए.,पर्यवेक्षक मालपाणी एन. आर., आणि प्रभारी काळे ए. एस. यांच्या मार्गदर्शनात विद्यालयाने हा उच्च मानक साधला आहे.सचिव कासट साहेब यांनी विद्यालयाच्या या यशाचे स्वागत केले आहे.राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या विविध प्रतिस्पर्धेत या विद्यालयाचे विद्यार्थी सक्रिय भाग घेतात. विद्यार्थ्यांच्या अभिनव प्रकल्पांनी देशातील उद्भावनाचा कोश समृद्ध केला आहे.अटल इनोव्हेशन मिशनने असे सांगितले आहे की, भारताचा भविष्य या तरुणांच्या हातात आहे, ज्यांना विचार करण्याचा, तयार करण्याचा आणि नवीन कल्पना अंगीकार करण्याचा साहस आहे.द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, बीड हे साहस आणि समर्पण यातून आगामी दिवसातही अनेक विद्यार्थ्यांना तयार करत राहील.

# तलवाडा ग्रामपंचायतीला मासिक सभा व ग्रामसभेचा पडला विसर ; चार वर्षात कागदोपत्री घेतल्या सभा

गेवराई दि.१७ (प्रतिनिधी) :– गावचा विकास करण्यासाठी गावात ग्रामपंचायत अस्तित्वात आल्यानंतर सरपंच, उपसरपंच आणि कार्यकारी मंडळ यांच्या माध्यमातून दरमहा कार्यकारी मंडळाची मासिक सभा घेऊन विकासात्मक धोरण आखण्यात येते तर ग्रामसभा घेऊन गावातील जनतेकडून गावाच्या विविध समस्याचे निराकरण करण्याचे काम करावे लागते. परंतु तलवाडा याठिकाणी गेल्या चार वर्षांत मासिक सभा व ग्रामसभा या फक्त कागदोपत्रीच घेण्यात आलेल्या आहेत. प्रत्यक्ष रेकॉर्ड मात्र कोरेच असल्याने दिवसेंदिवस या कार्यालयाचा ढिसाळ कारभार समोर येत आहे. याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीच लक्ष देऊन चौकशी करावी अशी मागणी गेल्या अनेक दिवसांपासून करण्यात येत आहे. याप्रकरणी ग्रामपंचायतचे सदस्य तथा सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी बीड तसेच गटविकास अधिकारी पं.स.गेवराई यांच्याकडे निवेदन दिलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायतीमध्ये सध्या प्रशासक असल्याने पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे आमचे कोणीच काही करू शकत नाही अशा तोऱ्यात कर्मचारी वागत असून ग्रामविकास अधिकारी यांचा यावर वचक राहिला नसल्याचे दिसून येत आहे. मागील सहा ते सात महिन्यापासून प्रशासक नेमण्यात आल्याने ग्रामसभा घेण्यात आली नाही व मासिक सभाही घेतली गेली नाही. परंतु अनेक कामाचे ठराव मात्र घेण्यात आलेले आहेत. ते कसे घेतले, कोणी घेतले, त्यांना कोणी संमती दिली, गटविकास अधिकारी यांची मंजुरी घेतली आहे का ? असे एक ना अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. सध्या हि परिस्थिती असली तरी सरपंच, उपसरपंच, सदस्य अस्तित्वात असतानाही मासिक सभा न घेताच अनेक कामे बोगस करण्यात आलेली आहेत. याची तक्रार सत्ताधारी सदस्य यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी बीड तसेच गटविकास अधिकारी कार्यालय गेवराई याठिकाणी केलेली आहे. परंतु त्यावर अद्याप कार्यवाही झाली नसल्याने आताही मासिक सभा आणि ग्रामसभा न घेताच फक्त कागदोपत्री दाखवून जनतेची आणि वरिष्ठांची दिशाभूल करण्यात येत आहे. याची सविस्तर चौकशी करण्यात येऊन मासिक सभा आणि ग्रामसभेचे रेकॉर्ड तपासावे अशी मागणी होऊ लागली आहे. याकडे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी यांनी लक्ष देऊन कार्यवाही करावी अशी भावना जनतेच्या मनात निर्माण झाली आहे. अनेक कामामध्ये अनियमितता असल्याने गावच्या विकासाला खीळ बसवण्याचे काम ग्रामपंचायत प्रशासनाकडून होत असून आर्थिक गैरव्यवहार करण्याबरोबरच रेकॉर्डही कोरेच ठेवून ढिसाळ कारभाराचा जणूकाही पाढाच सुरू आहे. आतातरी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन जनतेला न्याय द्यावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## बीड जि.प.व.पं.स.निवडणुका संदर्भात शेख मुजीब यांच्या उपस्थितीत गावोगावी बैठका

बीड दि १७ (प्रतिनिधी) - शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुरकर व शिवसेना नेते तथा संपर्कनेते अंबादास दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड तालुक्यातील जि.प.व पं.स. निवडणुकीत घवघवीत यश संपादन करण्यासाठी शिवसेना अहिल्यानगरचे माजी जिल्हाप्रमुख शेख मुजीब भाई यांची बीड विधानसभा संपर्कप्रमुख पदी निवड केली आहे. आगामी जि प व पं स. ताकतीने लढण्यासाठी शिवसैनिक व नागरिकांनी सज्ज व्हावे असे आवाहन संपर्कप्रमुख शेख मुजीब यांनी केले. बीड तालुक्यातील विविध गावांमध्ये जाऊन मुजीब भाई व जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे,शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंधन युवासेना उपजिल्हा अधिकारी अशफाक शेख यांनी गावकरी व शिवसैनिकांना उद्धवजी ठाकरे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची विनंती केली व अडीअडचणी समजावून घेतल्या, यावेळी बोलताना शेख मुजीब भाई म्हणाले की पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी माझ्याकडे बीड विधानसभा मतदारसंघ बांधण्यासाठी जबाबदारी दिलेली आहे. हि जबाबदारी पार पाडण्यासाठी मला तुमची गरज आहे. बीड मतदारसंघातून तुमच्यासारख्या कडवट व निष्ठावंत शिवसैनिकांमुळे तीन वेळा शिवसेनेचाच आमदार निवडून आलेला आहे. हा पुर्वीचाच बालेकिल्ला आहे तो पुन्हा नव्याने बांधुन आपल्याला मजबूत करायचा आहे. येणाऱ्या जि.प. व पं.स. निवडणुकीत आपल्याला ताकदीने लढायची व जिंकायचीय त्यासाठी आजपासुनच ताकदीने कामाला लागा असे आवाहन त्यांनी केले.

## राज्यस्तरीय स्केटिंग म्युझिकल चेअर स्पर्धेत सेंट झेवियर स्कूलचे बक्षीसांची लय लूट


बीड दि १८(प्रतिनिधी) - येथील जालना रोड येथील सेंट झेवियर स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत घवघवीत यश मिळविले या यशाबद्दल शाळेच्या प्राचार्य फादर जेम्स थोरात व जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देऊन कौतुक केले.

दिनांक १३ व १४ रोजी जळगाव जिल्हा येथे राज्यस्तरीय म्युझिकल चेअर स्केटिंग स्पर्धा पार पडल्या या स्पर्धेसाठी बीड जिल्ह्यातील जालना रोड येथील सेंट झेवियर स्कूलच्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला या स्पर्धा सर्व वयोगटा नुसार पार पडल्या यामध्ये आपल्या शाळेतील ६ ते ८ वयोगटात अर्श पठाण यांनी एक सुवर्ण व एक रोप्य



पदक पटकाविले अब्रार खान याने एक कास्यपदक पटकावले नंतर वयोगट ८ ते १० मध्ये तनुश्री खडके हिने सुवर्ण, रोप्य आणि कास्य असे तीनही पदकांची कमाई केली आयुष तोडकर, वेदांत कातकडे, हर्षदा पेटकर व श्रीओम पेटकर या खेळाडूंनी रोप्य आणि कास्यपदकांची कमाई केली या सर्व खेळाडूंचे कौतुक शाळेच्या समन्वयक भाग्यश्री कैलासे व शिक्षक लिझ्झमा जोसेफ, चंदा साबळे, कोमल कापसे, नीलिमा टाकसांडे तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंचे मनोबल उंचावले या खेळाडूंना मार्गदर्शक म्हणून मोलाचे मार्गदर्शन श्री सूर्यकांत शाहूराव घोलप यांचे लाभले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# देशसेवेची वाट निवडलेल्या तरुणांचा आमदार सुरेश धस यांच्या हस्ते सन्मान



## पाटोदा तालुक्याचा अभिमान उंचावला

पाटोदा दि.१८ (प्रतिनिधी) – देशसेवेसाठी सैन्यदलात निवड झालेल्या तरुणांचा सन्मान करून त्यांना पुढील वाटचालीस प्रेरणा देण्याचा गौरवपूर्ण उपक्रम आमदार सुरेश धस यांच्या हस्ते पाटोदा तालुक्यात पार पडला. बेंगळुरू येथे झालेल्या पॅराकमांडो प्रशिक्षणात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केलेले महा. सांगवी (ता. पाटोदा) येथील गोकुळ तुकाराम गर्जे तसेच शहीद जवान स्व. संजय भाकरे यांचे चिरंजीव आणि भारतीय सैन्यात लेफ्टनंट पदावर नियुक्त झालेले आदित्य संजय भाकरे यांचा यावेळी सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

गोकुळ तुकाराम गर्जे यांनी बेंगळुरू येथे पार पडलेल्या अत्यंत कठोर आणि आव्हानात्मक पॅराकमांडो प्रशिक्षणात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या कार्यक्षमता, शिस्त आणि जिद्दीचे दर्शन घडवले. त्यांच्या या यशस्वी निवडीबद्दल आमदार सुरेश धस यांनी त्यांचा सत्कार करून मनःपूर्वक अभिनंदन केले आणि पुढील सैनिकी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी नगराध्यक्ष राजू जाधव, गोकुळचे वडील तुकाराम गर्जे, तसेच योगेश सानप, अभिजित गर्जे आणि महेश गर्जे उपस्थित होते.

याच कार्यक्रमात शहीद जवान स्व. संजय भाकरे यांचे सुपुत्र आदित्य संजय भाकरे यांची भारतीय सैन्यात लेफ्टनंट पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. शहिदाच्या घरातून पुन्हा एकदा देशसेवेचा दीप प्रज्वलित झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. आदित्य भाकरे यांच्या या गौरवपूर्ण यशाबद्दल आमदार सुरेश धस यांनी त्यांचे कौतुक करत पुढील उज्ज्वल आणि यशस्वी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

देशसेवेसाठी स्वतःला झोकून देणाऱ्या तरुणांचा सन्मान हा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत आमदार सुरेश धस यांनी अशा तरुणांमुळेच राष्ट्राची शक्ती अधिक बळकट होत असल्याचे मत व्यक्त केले. या सत्कार सोहळ्यामुळे पाटोदा तालुक्यात अभिमानाची भावना निर्माण झाली असून, इतर तरुणांनाही देशसेवेच्या मार्गावर जाण्याची प्रेरणा मिळत आहे.

# आपले जीवन समृद्ध करण्यासाठी सकाम कर्म आवश्यक

## ह.भ.प.कृष्णा महाराज रामदासी यांचे प्रतिपादन

बीड दि.१८ (प्रतिनिधी)– ग्रंथ हे जीवनासाठीचे उत्तम मार्गदर्शक असतातच, वाचेल तो वाचेल, हे सत्य आहेच. वाचन चळवळीचे स्वरूप बदलते आहे.. तेही स्वीकारले जाते. वाचनासोबतच ग्रंथाचा अभ्यास, चर्चा, चिंतन हा उपक्रम आपण हाती घेतलेला आहे. त्याअनुषंगानेच दर बुधवारी असणाऱ्या ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयाच्या ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गात बुधवार दि. १७-१२-२०२५ रोजी सायं. ५.३० ते ६.३० या वेळेत वाचनालयाच्या सभागृहात ह.भ.प. कृष्णा महाराज रामदासी यांचे ज्ञानेश्वरीवर निरुपण संपन्न झाले.

या प्रसंगी महाराजांनी ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या, संत ज्ञानेश्वर माऊलींचे सकाम कर्माविषयीचे विचार तसेच मानवातील राजस, तामस व सात्त्विक गुणांवर सखोल विवेचन केले. मनुष्याने आयुष्यात सतत विविध कर्म करत राहिले पाहिजे. माऊलींनी ज्ञानेश्वरी लिहिताना वेदांचा सिद्धांत कुठेही बाधित होणार नाही, याची पूर्ण दक्षता घेतलेली आहे, असे त्यांनी सांगितले.वेदांनुसार मोक्ष कर्मानेच प्राप्त होतो आणि हाच विचार माऊलींनी ज्ञानेश्वरीत मांडला आहे. सत्य व नित्य कर्माच्या आचरणातूनच मोक्षप्राप्ती शक्य आहे, हे पटवून देताना महाराजांनी संध्या-वंदन, देवपूजा व नित्यकर्म यांचे महत्त्व अत्यंत सोप्या व सहज भाषेत स्पष्ट केले.

एकादशी व्रत हे सर्वश्रेष्ठ व्रत असल्याचे सांगत, त्या दिवशी भजन, पूजन, चिंतन-मनन व हरिजागर करण्याचे आवाहन त्यांनी केले. जागर म्हणजे केवळ मनोरंजनात्मक सिनेमा पाहणे नव्हे, तर भगवंताच्या नामस्मरणात तल्लीन होणे होय, असेही त्यांनी नमूद केले. पंचमहाभूतांपासून बनवलेले हे शरीरप्रकृती .ज्या भुताचा प्रभाव म्हणजे सत्वगुणापासून ज्ञानेंद्रिय रजोगुनापासून कर्मेंद्रिय यांची कर्मे जशी थांबत नाहीत, कान ऐकण्याचे कर्म थांबू शकत नाही किंवा तो बघण्याची कर्म करत नाही,तसेच डोळ्याचे पण.... एकूण प्रकृती हे कर्म आहे, ती स्वप्न किंवा जागृती ही कर्म करीतच राहते. शास्त्रने जी विहित कर्म दिलेली आहेत ती करीतच जावी. श्राद्ध कर्म न करता केवळ आश्रमात अन्नदान केलं तर कर्म होते , त्याचे फळ जे असेल ते मिळेल ,श्राद्ध कर्मफल किंवा त्यापासून मुक्ती होणारी नसते. एकादशीला जागरण व्हावे त्यात भजना ऐवजी चित्रपट पाहून ते केले तर ते भौतिक सुखप्राप्तीला कारण होईल पण विहित कर्म न केल्याने पाप पदरी पडते. भगवद्गीतेतील कर्म सिद्धांतावरील ज्ञानेश्वरीत विस्ताराने माऊलीने केलेले भाष्य, आज ह. भ. प. कृष्णा महाराज रामदासी यांनी ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गातून सामान्याला समजेल अशा शब्दात सांगितला सदरील कार्यक्रम विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री. अमोलकचंदजी सुराणा, उपाध्यक्षा डॉ. रोहिणीताई वैद्य, सदस्य ॲड. कालीदासनाना थिगळे, डॉ. हेमलता पाटील, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर, सरचिटणीस ॲड गोविंद कासट यांच्यासह कार्यकारी मंडळातील पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला कार्यक्रम यशस्वतेसाठी ग्रंथपाल ग्रंथमित्र गणेश शेंडगे, किशोर ठोसर, कुमार देशमुख, संतोष जगताप, रमेश जोशी, रामेश्वर जाधव यांनी परिश्रम घेतले.

# संगीत श्री गुरुचरित्र पारायणाची सांगता ; आज सामूहिक श्रीसूक्त हवन

बीड (प्रतिनिधी) : बहुसोमयाजी यज्ञेश्वर महाराज सेलूकर यांच्या उपस्थितीत दिनांक १६ ते २० डिसेंबर या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून गुरुवारी बाळू महाराज नाव्हेकर यांच्या संगीतमय गुरुचरित्र कथेची सांगता झाली यावेळी शेकडो भाविकांची उपस्थिती होती.

शहरातील सुभाष रोडवरील अमृत मंगल कार्यालय येथे बहुसोमयाजी यज्ञेश्वर महाराज सेलूकर यांच्या पावन उपस्थितीत दिनांक १६ ते २० डिसेंबर या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने गुरुवारी बाळू महाराज नाव्हेकर यांच्या सुमधुर वाणीतून सादर झालेल्या संगीतमय श्री गुरुचरित्र कथेची सांगता मोठ्या भक्तिभावात झाली. या वेळी शेकडो भाविकांनी उपस्थित राहून कथारसाचा आनंद घेतला.कार्यक्रमस्थळी भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून उपस्थित भाविकांनी गुरुचरित्राच्या संगीतमय कथेमुळे अध्यात्मिक अनुभूती घेतल्याची भावना व्यक्त केली. या धार्मिक उपक्रमांतर्गत बहुसोमयाजी यज्ञेश्वर महाराज सेलूकर यांच्या उपस्थितीत विविध धार्मिक विधी व कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.आज शुक्रवारी सामूहिक श्रीसूक्त हवन तसेच दर्शेष्टि यज्ञ होणार असून दि. २० रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सर्व कार्यक्रमासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यज्ञ सेवा समिती बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'उतरण' मधील गझलेत वर्तमान समाजातील चिंतन आले आहे-प्रभाकर साळेगावकर

बीड (प्रतिनिधी)– ज्येष्ठ गझलकार श्रीरामगिरी यांच्या 'उतरण' या गझलसंग्रहाचे प्रकाशन शिरूर (कासार) येथे सातवे सिंदफणा मराठी साहित्य संमेलनात दि.१७.१२.२०२५ रोजी दुपारी २.००वाजता ज्येष्ठ कवी प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ कवी श्रीधर नांदेडकर, कविसंमेलनाध्यक्ष सय्यद अल्लाउद्दीन,कवी विठ्ठल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी शेरांचे उदाहरण देऊन कवी प्रभाकर साळेगावकर म्हणाले, उतरण मधील गझलेत वर्तमान समाजातील चिंतन आले आहे. संवेदनशील आणि चिंतनशील वृत्तीमुळेच श्रीराम गिरी यांना गझल लिहिणे शक्य झाले. यावेळी ज्येष्ठ कवी सय्यद अल्लाउद्दीन यांनी 'लोक' ही गझल आपल्या गोड आवाजात गाऊन रसिकांची दाद मिळवली. 'उतरण' हा गझलसंग्रह म्हणजे गझल क्षेत्रातील उंच भरारी असल्याचे सांगून कवी विठ्ठल जाधव यांनी शुभेच्छा दिल्या. या प्रकाशन सोहळ्याला सत्यप्रेम लगड,अनिल होळकर,जगन्नाथ कांबळे इत्यादी कवींसह मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्यांक दिन साजरा

बीड, दि.१८ (जिमाका) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखली अल्पसंख्यांक दिन संपन्न झाला.

या बैठकीस अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक,सामान्य प्रशासनचे अपर जिल्हाधिकारी शैलश सुर्यवंशी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा नियोजनचे नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे, अस्पसंख्यांक समितीचे सदस्य व संबधित विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.या बैठकीत अल्पसंख्यांक समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांवर प्रकाश टाकण्यात आला. तसेच या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून जास्तीत जास्त लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा, अशा सूचना देण्यात आल्या.अल्पसंख्यांक समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची सविस्तर आढावा घेण्यात आला.

अचारसहिंता संपल्यानंतर या विविध योजनाचा लाभार्थ्याना लाभ मिळतो की नाही याची खात्री करुन संबधित विभागास तशा सूचना देऊन शासनाच्या विविध योजना तळागाळातील अल्पसंख्याकापर्यंत पोहचण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे श्री जॉन्सन म्हणाले. अल्पसंख्याक समितीचे सदस्यांनी योजना संबधित विविध अडचणी जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्या तसेच जिल्हाधिकारी यांनी सर्व संबधित विभागाच्या अधिका-याना उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्यामूळे त्यांचे जिल्हयाधिका-याप्रती आभार व्यक्त केले.

# बीडमध्ये विजय नाना काकडे यांच्या पुढाकारातून वाहनांना रिफ्लेक्टर लावण्याचा कार्यक्रम संपन्न





बीड, दि. १७ (प्रतिनिधी)– रात्रीच्या वेळी वाहनांची दृश्यता वाढून अपघातांचे प्रमाण कमी व्हावे, या महत्त्वपूर्ण उद्देशाने विश्वगती मोटर मालक-चालक ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने वाहन सुरक्षेसाठी वाहनांवर प्रत्यक्ष रिफ्लेक्टर लावण्याचा कार्यक्रम असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष विजय नाना काकडे यांच्या पुढाकारातून बीड जिल्हा वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक सानप साहेब, पाडळसिंगी महामार्ग पोलीस, मांजरसुंबा महामार्ग पोलीस उपनिरीक्षक ढगरे साहेब, तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे (आरटीओ) गावडे साहेब यांच्या उपस्थित घेण्यात आला. रात्रीच्या वेळी अनेक वेळा जड व मालवाहू वाहनांची योग्य दृश्यता नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. ही बाब लक्षात घेऊन वाहनांच्या मागील व बाजूच्या भागावर रिफ्लेक्टर लावण्याचा कार्यक्रम विश्वगती मोटर मालक-चालक ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष विजय नाना काकडे यांच्या पुढाकारातून घेण्यात आला. वाहनांवर प्रत्यक्ष रिफ्लेक्टर लावल्यामुळे दूरवरूनच वाहन स्पष्ट दिसून येत असून इतर वाहनचालकांना वेळीच अंदाज येण्यास मदत होते. परिणामी अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होण्यास हातभार लागणार आहे. या कार्यक्रमाचे प्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांनी वाहन चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करत वाहनांवर आवश्यक सुरक्षात्मक साधने वापरण्याचे महत्त्व विशद केले. तसेच यावेळी अनेक वाहनांवर प्रत्यक्ष रिफ्लेक्टर बसविण्यात आले. या सामाजिक व उपयुक्त उपक्रमाबद्दल उपस्थित वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले. प्रशासन व सामाजिक संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून असे उपक्रम सातत्याने राबविले गेल्यास रस्ते अपघातांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाप्रसंगी ट्रान्सपोर्ट धारक, वाहन मालक व चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.बाबा आढाव व साथी पन्नालाल सुराणा यांना अभिवादन

## सभेचे शनिवारी बीड येथे आयोजन

बीड (प्रतिनिधी) : महाराष्ट्रातील व देशातील असंघटीत कष्टकर्यांचा आधारवड डॉ.बाबा आढाव यांचे पुणे येथे तर साथी पन्नालाल सुराणा यांचे सोलापूर येथे निधन झाले.त्यांना अभिवादन करण्यासाठी शनिवार दिनांक २० डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ.बाबा साहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,नगर रोड बीड येथे अभिवादन सभेचे आयोजन बीड हमाल मापाडी युनियन व असंघटीत मजदूर पंचायत ने केले आहे.

सदर अभिवादन सभेसाठी डावे,पुरोगामी,लोकशाही वादी,कार्यकर्ते व राजकीय पक्ष व कामगार, कर्मचारी संघटना यांनी उपस्थित रहावे असे आवाहन कॉ.नामदेव चव्हाण,राजकुमार घायाळ,शेरजमा खान पठाण,नवनाथ नाईकवाडे,रामभाऊ बादाडे,परमेश्वर रोडे,बबन कुकडे,यांच सह पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन केले.

# जाचक अटी आणि किचकट प्रक्रियेत अडकली जन्म-मृत्यू नोंदणी

## पाटोदा तालुक्यात सर्वसामान्यांची अडथळ्यांची शर्यत संपेना

पाटोदा दि.१८ (प्रतिनिधी)– जन्म-मृत्यू नोंदणीचे अधिकार महसूल विभागाकडे वर्ग झाल्यापासून पाटोदा तालुक्यात ही प्रक्रिया अत्यंत जाचक आणि किचकट बनली असून सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. वयोवृद्ध नागरिक वर्षानुवर्षे तहसील कार्यालयाचे खेटे मारूनही जन्म किंवा मृत्यूच्या नोंदी मिळत नसल्याने प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पूर्वी हा विषय न्यायालयाकडे असताना अशा प्रकारच्या अडचणी येत नव्हत्या ; मात्र सुमारे दोन वर्षांपूर्वी शासन निर्णयानुसार हा विषय महसूल विभागाकडे वर्ग झाल्यानंतर प्रशिक्षित आणि कायदेशीर माहिती असलेल्या कर्मचाऱ्यांचा अभाव असल्याने समस्या अधिकच गंभीर झाल्याचे चित्र आहे.

या किचकट प्रक्रियेचे जिवंत उदाहरण कुसळंब येथील वयोवृद्ध महिला सुमन विष्णू गायकवाड यांनी दिले आहे. त्यांनी सांगितले की, त्या गेल्या दीड वर्षांपासून पाटोदा तहसील कार्यालयात आपल्या वडिलांच्या मृत्यूच्या नोंदीसाठी वारंवार ये-जा करत आहेत ; मात्र शपथपत्रे,



साक्षीदारांची कागदपत्रे आणि इतर आवश्यक दस्तऐवज सादर करूनही अद्याप मृत्यू नोंद झाली नाही. १९७५ साली मृत्यू झालेला असताना आज आधार कार्ड कुठून आणायचे, शवविच्छेदन अहवाल कसा सादर करायचा, तसेच घरच्या घरी मृत्यू झाल्यास दवाखान्याच्या नोंदीचे प्रमाणपत्र कसे मिळवायचे, असे सवाल त्यांनी उपस्थित केले आहेत.त्याचप्रमाणे पाटोदा येथील रहिवासी फरीदा ताहेर शेख यांनी त्यांच्या जन्म नोंदीसाठी तहसील कार्यालयात अर्ज केला असता, तो अर्ज पोलिस पडताळणीसाठी पाठवण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. अनेक वर्षांपासून पाटोदा येथे वास्तव्यास असतानाही स्थानिक रहिवासी असल्याचा अहवाल पोलिसांकडून का मागवला जात आहे, तसेच प्रशासन नेमका कोणत्या स्वरूपाचा अहवाल अपेक्षित आहे, असा प्रश्न शेख कुटुंबीयांकडून उपस्थित करण्यात आला आहे. मुख्याधिकाऱ्यांकडून किंवा संबंधित यंत्रणेकडून रहिवासी प्रमाणपत्र दिल्यानंतरही पुन्हा पोलिसांकडे खेटे मारावे लागत असल्याने ही प्रक्रिया अन्यायकारक असल्याची भावना नागरिकांमध्ये तीव्र होत आहे. जन्म-मृत्यू नोंदणीसारखी मूलभूत सेवा इतकी गुंतागुंतीची, जाचक आणि वेळखाऊ असणे योग्य नसून, या प्रक्रियेत तातडीने सुलभता आणणे आवश्यक आहे. त्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी प्रक्रिया तातडीने सोपी, स्पष्ट आणि नागरिकाभिमुख करावी, तसेच या गंभीर प्रश्नात लोकप्रतिनिधींनी, विशेषतः आमदार सुरेश धस यांनी लक्ष घालून ठोस तोडगा काढावा, अशी जोरदार मागणी पाटोदा तालुक्यातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## जाहीर प्रगटण

सर्व आम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे जाहीर करण्यात येते की, जाहीर प्रगटन देणार मी श्रीकांत मोहनराव वारंगुळे वय-४३, धंदा-व्यापार रा.माऊली अपार्टमेंन्ट, फुलाई नगर, बीड ता.जि.बीड हा खाली नमुद केलेली मिळकत खरेदी करण्याचा निर्णय घेतलेला असुन सदर मिळकती बाबत दि.१८/१२/२०२५ रोजी १)श्रीमती वैशाली संजयराव पाठक २) संजय रविंद्रराव पाठक दोघेही रा.माऊली आरती अपार्टमेंट फुलाई नगर बीड यांच्याकडुन इसार पावती (ॲग्रीमेंट टु सेल) करण्यात आलेली आहे.

सदर मिळकत र.डि.जि.प.बीड सब कि.पं.स.व ता.बीड पैकी शहर बीड मोहल्ला सावता माळी चौक येथील नवीन वाढीव नगर परिषद हद्दीचे आतील सर्व्हे नंबर २१८/अ तरफ बलगुजर मधील ब्लॉक- ४ मधील माऊली आरती या अपार्टमेंन्ट मधील फर्स्ट फ्लोअर मधील सदनिका क्रमांक ४ (२ B.H.K) ज्यास नगर परिषद बीड वार्ड २ गट ९ मालमत्ता क्रमांक जुना २.९.२१४ पैकी व नवा २.९.४९० असा आहे. ज्याचा कारपेट एरिया एकुण क्षेत्रफळ ५७.२४ चौरस मीटर आहे. तसेच बिल्टअप एरियाचे क्षेत्रफळ ७२.११ चौरस मीटर आहे.

माऊली आरती या इमारतीची चतु:सिमा पुढील प्रमाणे पुर्वेस-तावरे यांची जमीन, पश्चिमेस-याच लेआउट मधील प्लॉट क्रमांक-२४ व तावरे यांची जमीन, दक्षिणेस-तावरे यांची जमीन, उत्तरेस याच लेआउट मधील ९ मीटर रुंदीचा रस्ता व प्लॉट क्रमांक २२

सदनिकर क्रमांक ४ (२B.H.K) ची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस-पॅसेज, पश्चिमेस-याच लेआउट मधील प्लॉट क्रमांक २४ व तावरे यांची जमीन, दक्षिणेस-सदनिका क्र.१५, उत्तरेस-याच लेआउट मधील ९ मीटर रुंदीचा रस्ता व प्लॉट क्रमांक २२ सदर मिळकती बाबत कोणत्याही व्यक्तीस कोणताही हक्क, हिस्सा, बोजा, तारण, कर्ज, दावा, वाद, करार, दस्त ऐवज, न्यायालयीन किंवा पोलीस प्रकरणा बाबत काही आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन १० (दहा) दिवसाच्या आत खाली दिलेल्या नंबरवर योग्य पुराव्यानिशी कळवावे.

ठरलेल्या मुदतीत कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क किंवा दावा नाही असे समजुन पुढील खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही दाव्यास जाहीर प्रगटन देणार जबाबदार राहणार नाहीत किंवा त्यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

दि.१८.१२/२०२५
स्थळ-बीड

जाहीर प्रगटन देणार
**श्रीकांत मोहनराव वारंगुळे**
मो.नं.९९२२१८६१८७/ ९१११३३७३३७

# आ.सुरेश धस यांच्या ठाम प्रयत्नांमुळे फार्मर आयडी दुरुस्ती संदर्भात हालचाली सुरू

## जमाबंदी आयुक्तांची तहसीलदारांशी दूरदृश्य संवादातून स्पष्ट सूचना, वेळबद्ध कार्यवाहीचे आदेश



पाटोदा दि.१८ (प्रतिनिधी)– पाटोदा तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यात फार्मर आयडी प्रक्रियेत झालेल्या गंभीर तांत्रिक त्रुटींमुळे शेकडो शेतकरी अडचणीत सापडले असून प्रत्यक्षात अल्प क्षेत्रधारक असतानाही कागदोपत्री बहुभूधारक ठरवल्याने पोखरा योजनेसह विविध कृषी योजनांपासून ते वंचित राहण्याची स्थिती निर्माण झाली होती, मात्र या गंभीर विषयावर आमदार सुरेश धस यांनी सातत्याने आणि आक्रमक भूमिका घेत शासन स्तरावर पाठपुरावा केल्यामुळे अखेर महसूल प्रशासन हालचालीत आले आहे. पाटोदा येथील तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालयाकडून जिल्हा प्रशासनास सादर करण्यात आलेल्या पत्रात फार्मर आयडी तयार करताना प्रयोगात्मक तत्त्वावर काही ठिकाणी प्रत्यक्ष शेती क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्र नोंदवले गेल्याचे स्पष्ट करण्यात आले असून यामुळे अल्पभूधारक शेतकरी कागदोपत्री मोठ्या क्षेत्राचे मालक ठरत असल्याने त्यांच्या योजनांवरील पात्रतेवर गंडांतर आले आहे. या पत्रात फार्मर आयडी दुरुस्ती प्रक्रियेत येणाऱ्या व्यावहारिक अडचणींचाही सविस्तर उल्लेख करण्यात आला असून ग्राम महसूल अधिकारी स्तरावर मर्यादित सुविधा, मोबाईल क्रमांक बदल, पत्ता दुरुस्ती, जमिनीची भर किंवा चुकीने जोडलेली जमीन वगळण्याची गुंतागुंतीची प्रक्रिया तसेच ओटीपीसारख्या तांत्रिक अटींमुळे दुरुस्ती खोळंबत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर जमाबंदी आयुक्तांनी बीड जिल्ह्यातील सर्व संबंधित तहसीलदार आणि महसूल अधिकाऱ्यांशी दूरदृश्य संवाद साधून फार्मर आयडीवरील वाढीव व चुकीच्या नोंदींची तातडीने तपासणी करून प्रत्यक्ष क्षेत्राच्या आधारे दुरुस्ती करण्याचे स्पष्ट आदेश दिले असून ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्या समन्वयाने प्रत्यक्ष पाहणी करून वेळबद्ध अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत, तसेच कोणताही पात्र शेतकरी केवळ तांत्रिक त्रुटींमुळे शासकीय योजनांपासून वंचित राहू नये याची विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आमदार सुरेश धस यांच्या पाठपुराव्यामुळेच महसूल विभाग, जमाबंदी आयुक्त आणि जिल्हा प्रशासन सक्रिय झाले असून फार्मर आयडी दुरुस्तीची प्रक्रिया प्रत्यक्षात सुरू होण्याचे संकेत मिळाले आहेत, त्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## जाहीर प्रगटण

**जाहिर प्रगटन देणार – पवन कुंडलीक शिंदे**
रा. शाहूनगर, विठ्ठल मंदिरा जवळ, बीड ता. जि. बीड

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळिवण्यात येते की मी पवन कुंडलीक शिंदे रा. शाहूनगर, विठ्ठल मंदिरा जवळ, बीड ता. जि. बीड आसुन माझा व अमृता सिद्धेश्वर कदम रा. शिदोड ता. जि.बीड यांची मौजे व ग्राम पंचायत मादळमोही येथील गट नंबर ३७४ मधील क्षेत्रफळ ०.४२ हे.आर. जमीन असुन जमिनीची चतुः सिमा ही खालील प्रमाणे आहे.

**पुर्वेस** – सरकारी रस्ता, **पश्चिमेस** – भगवान नामदेव गावडे
**दक्षिणेस** – जनाबाई आर्जुन भोपळे, **उत्तरेस** – विश्वंबर भोपळे

या प्रमाणे चतुः सिमा असलेली जमीन ही माझ्या म्हणजे अमृता सिद्धेश्वर कदम रा. शिदोड ता. जि.बीड यांच्या मालकीची असून त्या जमीनीचा विक्री व्यावहार हा पवन कुंडलीक शिंदे रा. शाहूनगर, विठ्ठल मंदिरा जवळ, बीड ता. जि. बीड यांच्या सोबत ठरलेला आहे. तरी मौजे व ग्राम पंचायत मादळमोही येथील गट नंबर ३७४ मधील क्षेत्रफळ ०.४२ हे. आर. आहे. तरी कोणाचा काही आक्षेप किंवा कोर्ट वाद, किंवा बोजा सरकारी किंवा निम सरकारी आसेल तर जाहिर प्रगटन जाहिर झाल्या पासून १५ दिवसात आत खाली दिलेल्या पत्यावर संबंधीत कागदपत्र सह संर्पक साधावा. १५ दिवसा नंतर कोणाची काहीही तक्रार नाही असे समजून खरेदी विक्रीचा व्यावहार पुर्ण केला जाईल.

जाहिर प्रगटन देणार
**पवन कुंडलीक शिंदे**
रा. शाहूनगर, विठ्ठल मंदिरा जवळ, बीड ता. जि. बीड
मो-९४२१३ २४३३३

# पार्श्वभूमी



## रत्नसुंदर अर्बन अॅप बँकेचा द्वितीय वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा



वडवणी (प्रतिनिधी): माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या रत्नसुंदर अर्बन को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि. माजलगाव या पतसंस्थेच्या वडवणी शाखेचा द्वितीय वर्धापनदिन आज वडवणी येथे अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

जयसिंग भैय्या सोळंके यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे संस्थेची प्रगती सातत्याने होत असून, सर्वसामान्यांच्या विश्वासावर उभी राहिलेली ही संस्था सहकार क्षेत्रात आदर्श ठरत आहे. शेतकरी, व्यापारी, युवक व महिला घटकांच्या आर्थिक सबलीकरणासाठी संस्थेचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे. रत्नसुंदर पतसंस्थेच्या वडवणी शाखेच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त, अनेकांनी उपस्थित राहून बँकेचे व्यवस्थापक, अधिकारी व कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या.

पान २ वर

# विज कंपनीच्या गलथान कारभारामुळे मोगऱ्यात पाच एकर ऊस जळाला

## दोन वर्षात दोनदा जळाला ऊस ; विजतार तुटल्याने लागली आग



**माजलगाव (प्रतिनिधी) : तालुक्यातील मोगरा येथील शेतकरी मोहन कल्याण कुलकर्णी यांचा तोडणीस आलेला उस विज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे विजतार तुटल्याने लागलेल्या आगीत जळाला आहे. दरम्यान दोन वर्षात दोनदा उस जळाल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.**

तालुक्यातील मोगरा येथील शेतकरी मोहन कल्याण कुलकर्णी यांची गट नं. ४ मध्ये शेती असुन त्यांचा पाच एकर उभा उस आहे. या उसाच्या शेतातुन विद्युत वाहिनी गेलेली असुन मागील वर्षी देखिल याच शेतक-याच्या शेतात आग लागली होती. याबाबत विज कंपनीस कळविले देखिल होते परंतु त्यांनी विजतार बदलली नाही. परिणामी जिर्ण झालेली विजतार तुटल्याने त्यांच्या उसाला आग लागली. शेतकरी मोहन कुलकर्णी व गावातील शेतक-यांनी ही आग विझविण्याचा प्रयत्न केला परंतु आग विझली नाही. यामध्ये संपुर्ण पाच एकर उस जळाल्याने शेतक-याचे प्रचंड नुकसान झाले असुन इतर ठिकाणी आग जावु नये याकरीता शेतक-यांनी शर्थीचे प्रयत्न केले. दरम्यान मागील वर्षी देखिल याच शेतक-याचा उस जळाला होता. याबाबत महावितरण कंपनीस वारंवार सांगुन देखिल दुर्लक्ष केल्याने पुन्हा यावर्षी उस जळाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे कारखाने या उसाला तिस टक्के कमी भाव देतात. त्यामुळे शेतक-याचे नुकसान झाले आहे. दरम्यान हा प्रकार घडल्याने शेतक-यातुन संताप व्यक्त केला जात असुन नुकसान भरपाई द्यावी अन्यथा आंदोलनाचा आक्रमक पावित्रा घेण्याचा इशारा देखिल देण्यात आला आहे.

## अल्पसंख्यांकांच्या मागणीला यश ; खुर्शीद आलम यांनी मानले आभार

### जिल्हाधिकारी आता तीन महिन्याला अल्पसंख्याकांची बैठक घेणार



बीड (प्रतिनिधी) : १८ डिसेंबर हे अल्पसंख्याकांच्या हक्काचे दिवस म्हणून साजरा केला जातो, याच निमित्ताने गुरूवार १८ डिसेंबर २०२५ रोजी अल्पसंख्याक दिवसानिमित्त बीड मा. जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजित करण्यात आले होते यावेळी खुर्शीद आलम यांनी मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे अल्पसंख्याक समाजातील सामाजिक, शैक्षणिक व अल्पसंख्याक भागाच्या विविध समस्या आणि विकास कामा बाबत मा. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांच्याकडे मागण्या केल्या तसेच दर तीन महिन्यांला अल्पसंख्यांकाची बैठक घेण्याची मागणी केली, यावेळी अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधी म्हणून शेख इर्शाद भाई, काजी मुजिबुरहेमान,गोपाळ धरे, डॉ.इमरान सर, जे.टी.साळवे, शेख वजीर, फिरदोस सर, रियाज सिद्दिकी, हनिफ खान, खतीब सर यांच्यासह आदी मान्यवरांनी अल्पसंख्यांक समाजाच्या समस्या मांडल्या, विशेष म्हणजे दर १८ डिसेंबर रोजी अल्पसंख्याकांच्या बैठके घेऊन फक्त फार्मूलेटीया केल्या जात होत्या पण यावेळी बीडचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन साहेबांनी नियोजन बद्ध अशी बैठक घेऊन सर्व मान्यवरांच्या मागण्यां लक्षपुर्वक ऐकून घेतल्या आणि दर तीन महिन्यांला अल्पसंख्यांकाची बैठक घेण्याचे आश्वासन दिले आहे

पान २ वर

## बीड शहर पोलिसांनी चोरीस गेलेले व हरवलेले मोबाईल नागरिकांना केले परत



बीड दि १८(प्रतिनिधी) : चोरीस गेलेले व हरवलेलेपैकी जवळपास १८ मोबाईल बीड शहर पोलिसांनी शोधून काढून ते अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते मूळ मालकांकडे सुपूर्द करण्याची कारवाई, डी वाय एस पी श्रीमती पूजा पवार व पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

यासंदर्भात माहिती अशी की मोबाईल हरवल्याच्या व चोरीस गेलेल्या च्या अनेक तक्रारी बीड शहर पोलीस ठाण्यात दाखल झाल्या होत्या. तू माझ्यावर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप खेडकर, पोलीस अंमलदार सुषेण उगले व पोलीस अंमलदार सय्यद शहनशहा यांनी तांत्रिक पद्धतीने तपास करून जवळपास १८ मोबाईल जप्त केले होते तसे.

शोधून काढलेले मोबाईल पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते संबंधित नागरिकांना परत देण्यात आले. आतापर्यंत बीड शहर पोलिसांनी या पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या प्रत्येक गुन्ह्याच्या

पान २ वर

## धारूर परिसरात व तालुक्यात बिबट्याचा वावर

### वनविभागाने तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी



किल्ले धारूर दि १८(प्रतिनिधी)- धारूर शहराच्या परिसरात व डोंगर भागात बिबट्याचा वावर वाढल्याने शहर व परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे व नागरिकांना बिबट्या निदर्शनास आल्याने ही भीती वाढली आहे त्यामुळे तात्काळ या बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी वनविभागाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

धारूर परिसरात डोंगराळ परिसर असल्याने विविध वन्य प्राण्यांचे वास्तव्य आहे या परिसरात गेल्या पंधरा दिवसापासून आडस रस्ता, तांदळवाडी रस्ता, पोलीस स्टेशन भाग या भागात बिबट्या निदर्शनास आल्याची चर्चा जोरदार होत असून सोशल मीडियावर ही फोटोसह विविध पोस्ट प्रसारित होण्याचे प्रकार घडल्याने नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे व विद्यार्थी नागरिक महिला या घरा बाहेर निघण्यास भीतीदायक

पान २ वर

## आ.प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रीमंडळात स्थान द्या – शहरअध्यक्ष गणेश म्हेत्रे



वडवणी (प्रतिनिधी): माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष व विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ओळख असलेले मा. आमदार श्री. प्रकाशदादा सोळंके यांची जनतेने सलग पाचव्यांदा आमदार म्हणून निवड केली आहे. ही निवड जनतेचा त्यांच्यावर असलेला विश्वास, त्यांच्या कार्यकौशल्याची पावती व त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक-राजकीय योगदानाची साक्ष देणारी आहे.

मा. आमदार श्री. प्रकाश दादा सोळंके यांनी आपल्या कार्यकाळात शेतकरी प्रश्न, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, सिंचन, रोजगारनिर्मिती तसेच सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर सातत्याने ठोस भूमिका घेतली आहे. मतदारसंघाच्या सर्वांगीण

पान २ वर

## कु.युगंधा कोंडेजकर चा शिष्यवृत्ती प्रदानाने सन्मान



बीड (प्रतिनिधी) : शुक्ल यजुर्वेदीय शिक्षण उत्तेजक संस्था बीड आणि मा म ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ पुणे,यांच्या संयुक्त विद्यमाने भगिनी निवेदिता कन्या विद्यालयात मार्च २०२५ च्या एसएससी परीक्षेत ९४.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावल्या बद्दल रुपये ३००० ची शिष्यवृत्ती कुमारी युगंधा योगेश कोंडेजकर हिस मिळाली.

दादेगाव माध्यमिक शाळेचे माध्यमिक मुख्याध्यापक योगेश बाळासाहेब कोंडेजकर यांची युगंधा ही लाडकी कन्या असून तिच्या यशाबद्दल अध्यक्ष अॅड. कालिदास ठगळे,सचिव प्राध्यापक विवेक वैद्य,शिष्यवृत्ती विभाग प्रमुख प्राध्यापक शशिकांत पसारकर, प्रभाकर सेलमुकर,सुधीर देशमुख आदी मान्यवरांनी रुपये ३००० चा धनादेश व प्रमाणपत्र देऊन सन्मान केला. या यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी अध्यक्ष सुनील देशमुख, दीपक किंबवणे, संदीप भळगट,डॉक्टर अशोक गांधी, श्रीधर पंत सहस्त्रबुद्धे, रवी देशमुख,मिलिंद देशमुख,भाजपचे जिल्हाध्यक्ष

पान २ वर

## मूल्यवर्धन प्रशिक्षणसाठी मुख्यकार्यकारी अधिकारी जितीन रहेमान व शिक्षणाधिकारी डॉ.किरण कुंवर यांचे मार्गदर्शन



बीड (प्रतिनिधी) : बीड तालुक्यातील सर्व शिक्षकांना जि. प. व खाजगी शाळेतील शिक्षकांना टप्प्याटप्प्याने शंभर टक्के शाळेसाठी मूल्यवर्धन २.० प्रशिक्षण दिले जातात. त्या टप्प्यातील प्रशिक्षणाकरिता माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी बीड जितीन रहेमान यांनी भेट देऊन प्रशिक्षणाची पाहणी केली. सदरील प्रशिक्षण आजच्या परिस्थितीमध्ये खूप आवश्यक आहे याची गरज लक्षात आणून दिली. हे प्रशिक्षण झाल्या नंतर आपल्या शाळेत विद्यार्थी व स्वतः मध्ये मूल्यांची रुजवणूक करावी. प्रशिक्षण मुथथा फाउंडेशन यांच्या वतीने शासनाद्वारे दिले जात आहे.सदरील प्रशिक्षण करिता शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुवर यांनी ही भेट देऊन रुजू होताच शिक्षकांना आपले कर्तव्य चोक बाजविण्यास सांगितले. कामाच्या बाबतीत मला हायगय बिलकुल चालत नाही. अशे प्रतिपादन केले.गटशिक्षणाधिकारी बीड यांनी शिक्षकांना मार्गदर्शन मध्ये सांगितले की मूल्यवर्धन प्रशिक्षण च्या माध्यमातून विद्यार्थ्यांन मध्ये सामाजिक मूल्य रुजविण्यास आपण पात्र झाला आहात,प्रत्येक मुल हे स्पेशल आहे असे समजून अध्यापना तुन उपक्रम मधून मूल्य रुजवावीत. उपशिक्षणाधिकारी अन्सारी अंजुम, जिल्हा शिक्षण प्रशिक्षणच्या अधिव्याख्याता

पान २ वर

## न्यू हायस्कूल गेवराई येथे कायदेविषयक शिबिर संपन्न

### मा.न्यायमूर्ती एस.एच.पाटील मॅडम यांचे विद्यार्थ्यांना कायदेशीर मार्गदर्शन




गेवराई (प्रतिनिधी) तालुका विधी सेवा प्राधिकरण, गेवराई व वकील संघ, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १८ डिसेंबर २०२५ गुरुवार रोजी न्यू हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, गेवराई येथे बालविवाह मुक्त भारत अभियान अंतर्गत बालविवाह प्रतिबंधक कायदा तसेच पॉक्सो कायदा (लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा) याविषयी कायद्याविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराच्या अध्यक्षस्थानी गेवराई न्यायालयाच्या मा. न्यायाधीश श्रीमती एस. एच. पाटील मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात संविधान वाचनाने करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून वकील संघाचे अध्यक्ष ए. आर. मुळे, उपाध्यक्ष एस. के. कारके व सचिव पी. ए. मडके उपस्थित होते.बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत अॅड. एस. पी. येवले व अॅड. सौ. एस. एस. रोटे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच पॉक्सो कायद्याविषयी अॅड. एम. डी. मुंडे, अॅड. ए. के. वावरे आणि गेवराई पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक राजेश गडवे यांनी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली.

यावेळी मा. न्यायाधीश एस. एच. पाटील मॅडम यांनी बालविवाह व बाल लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी या कायद्यांचे महत्त्व, त्याचे सामाजिक परिणाम आणि कायद्याची अंमलबजावणी सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.

पान २ वर

## बीड जिल्हा खादीम–उल–हुज्जाज कमिटीच्या अध्यक्षपदी हाजी बी.एस.मोहसीन यांची निवड

### सचिवपदी हाजी एजाज बेग, सहसचिवपदी हाजी सय्यद सलाहुद्दीन





बीड (प्रतिनिधी) : जिल्हाभरातून मुस्लीम बांधव मोठ्या प्रमाणावर हजयात्रासाठी जातात. हाजी यांच्या सेवेसाठी, हज जाण्याच्या अनुषंगाने सर्व प्रकारचे मार्गदर्शन करण्यासाठी बीड जिल्हा खादीम-उल-हुज्जाज कमिटीची स्थापना करण्यात आली आहे. या कमिटीच्या संस्थापक अध्यक्षपदी हाजी बी. एस. मोहसीन यांची नियुक्तीकरण्यात आली आहे.

बीड येथे झालेल्या बैठकीत सर्वानुमते बीड जिल्हा खादी-उल-हुज्जाज कमिटीची स्थापना करण्यात आली. यावेळी कमिटीच्या संस्थापक अध्यक्षपदी हाजी बी. एस. मोहसीन यांची निवड करण्यात आली तर सचिवपदी हाजी एजाज बेग सर, उपाध्यक्षपदी प्रा. ताज मुलानी, हाजी मोमीन मुशर्रफ मोमीन मुख्तार तर सहसचिवपदी हाजी सय्यद सलाहुद्दीन शमशोद्दीन यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मागील तीन वर्षा पासून हज यात्रेसाठी जाणाऱ्या हाजींच्या सेवेसाठी ही कमिटी काम करत आहे.

दर वर्षी ही कमिटी हज यात्रेसाठी जाणाऱ्या हाजी साठी दोन महिन्याची मार्गदर्शन शिबिर आयोजित करतात. मार्गदर्शन शिबिर मध्ये हज यात्रा मध्ये जे जे आमाल ( कार्य ) करावा लागतो ते सर्व आमाल सविस्तर मुफ्ती साहेब हाजियाना मार्गदर्शन करतात. हजियांसाठी बीड ते मुंबई एअरपोर्ट, मुंबई एअरपोर्ट

पान २ वर

## घाटनांदुर व परिसरामध्ये युरिया खताची जादा दराने विक्री होत असताना कृषी खात्याचे दुर्लक्ष

घाटनांदुर दि. १८ ( प्रतिनिधी) अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर व परिसरात रब्बी हंगामातील पिके गहू, ज्वारी, तीळ, हारभरा, आधी पिके जोमात आलेली आहेत या पिकांसाठी लागणार युरिया खात पिके वाढवण्याकरिता वापरतात मात्र, दुकानदार आडवुन शेतकऱ्यांना लुटत आहेत. सध्या खरीप हंगाम सुरू आहे. शेतकऱ्यांची पेरणी पूर्ण झाली आहे.परंतु, पिकांना खते देण्याच्या कालावधीमध्ये दुकानदारांकडून युरिया खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात आहे. या गंभीर बाबीकडे कृषी विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. यामुळे शेतकऱ्यांना कुणी वाली राहिलेला दिसत नाही. याप्रकरणी तातडीने कारवाईची मागणी शेतकरी करत आहेत.

कृषी विभागातर्फे खत, औषधे विक्रीवर नियंत्रण असणे गरजेचे आहे. असे असतांना ऐन मोसमात युरिया खतांचा दुकानदार जाणीवपूर्वक कृत्रिम तुटवडा निर्माण करीत आहेत.या प्रकारामुळे शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत आहे. तसेच युरिया खताची चढ्या दराने देखील विक्री होत आहे. युरिया खताची लिंकिंग न होता

पान २ वर

## दिव्यांग व अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनतून अडीच लाख रुपयांचे अनुदान मिळणार–जे.डी.शाह

बीड (प्रतिनिधी) : बीड जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहाताच्या सन्मानाने सहभागी करून घेण्यासाठी राज्य शासनाने विवाह योजनेच्या अनुदानात वाढ केली आहे. दिव्यांग - अव्यंग विवाहासाठी रुऊ १,५०,००० तर दिव्यांग - दिव्यांग विवाहासाठी रुपये २,५०,० १२,५०,००० इतके अनुदान देण्यात येणार आहे. ही रक्कम विवाहासाठी पती-पत्नीच्या संयुक्त बँक खात्यात थेट लाभहस्तांतरण (डीबीटी) प्रणालीद्वारे जमा केली जाणार असून, त्यापैकी ५० टक्के रक्कम दाम्पत्याने पाच वर्षांकरिता मुदतठेवीत ठेवणे अनिवार्य राहील. तरी बीड जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व अव्यंग यांनी आपले जीवन साथीचा शोध घेऊन विवाह प्रोत्साहन योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन समाजसेवक.जे.डी. शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. पत्रात पुढे म्हटले आहे की दिव्यांग व्यक्तींना सामाजिक

पान २ वर

## श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला ग्रीन को २०२५ पुरस्कार जाहीर



माजलगाव (प्रतिनिधी) : दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रातील प्रगत अनुभव आव्हाने आणि भविष्यातील दिशा घडून आणण्यासाठी ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार मंथन २०२५ या कार्यक्रमाचे आयोजन सहकार सभागृह विद्यापीठ रोड शिवाजीनगर पुणे येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा. श्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते ग्रीन को

पान २ वर

## डॉ.बाबा आढाव व पन्नालाल सुराणा यांना अभिवादन सभेचे शनिवारी आयोजन

बीड दि.१८ (प्रतिनिधी): असंघटीत कष्टकऱ्यांचा आधारवड डॉ.बाबा आढाव यांचे पुणे येथे तर साथी पन्नालाल सुराणा यांचे सोलापूर येथे निधन झाले. त्यांना अभिवादन करण्यासाठी शनिवार दिनांक २० डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे अभिवादन सभेचे आयोजन बीड हमाल मापाडी युनियन व असंघटीत मजदूर पंचायतचे वतीने करण्यात आले आहे.

पान २ वर

CMYK